
# हाकारा





## पुरोगामी वननीती कशी असावी ?

□ □ □

## आदिवासींच्या सामाजिक चळवळी

□ □ □

## ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचे लढे

वर्ष : चौथे । अंक : दुसरा । एप्रिल–जून १९८३

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## कार्यकारी मंडळ


| | |
|---|---|
| **अध्यक्ष** | गं. बा. सरदार |
| **उपाध्यक्ष** | शरद कुलकर्णी |
| **चिटणीस** | रा. के. मुटाटकर |
| **सहचिटणीस** | जगदीश गोडबोले |
| **खजीनदार** | अनिल गोरे |
| **सभासद** | विजय भानू |
| | गोविंद गारे |
| | श. गो. देवगावकर |
| | नान्सी गायकवाड |
| | जनार्दन वळवी |
| | दर्शन शंकर |


## सल्लागार मंडळ


| | |
|---|---|
| बाबा आढाव | जयंत पाटील |
| बाबा आमटे | विजय परुळकर |
| रावसाहेब कसबे | अनंतराव बोधनकर |
| सुधा काळदाते | अनुताई वाघ |
| विजय तेंडुलकर | विलास संगवे |
| वि. म. दांडेकर | वाहरु सोनवणे |
| मधुकर देवल | गीता साने |
| चित्रा नाईक | छाया सुरतवंती |
| आ. ना. नारळकर | दत्ता सावळे |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता ।

# हाकारा

( महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक )

## अनुक्रमणिका


पुरोगामी वननीती कशी असावी ?
**माधव गाडगीळ** ३–११

वनसंरक्षण व संवर्धनाची व्यवस्था
**वसंत पळशीकर** १२–१५

आदिवासींच्या सामाजिक चळवळी
**ऋषि मसराम** १६–२०

ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचे लढे
**दत्ता ताम्हणे** २१–२५

आदिमानव–कविता
**लक्ष्मण कदम** २५

नोसिल फिल्म टेक्निक्
**शिवाजीराव जामदार** २६–२७

वनौषधी व लोकविज्ञान कृतिसत्र
**संकलन- सुधीर जोग** २७–२८

आदिवासी विकासाच्या दिशा
**सुधीर जोग** २९–३१

माझा आदिवासी-कविता
**लक्ष्मण कदम** ३१

अलिप्त बुद्धिवादी (कविता)
अनुवाद : **शरद कुलकर्णी** ३२

ग्रामीण विकास व अनौपचारिक शिक्षणकार्य
–प्रशिक्षण शिबिर वृत्तांत ३३–३७

पुस्तक परीक्षण ३८–३९

मानव विज्ञान परिषदेच्या कार्याची माहिती ४०



वर्ष चौथे : अंक दुसरा
एप्रिल–जून १९८३
परिषद / हाकारा संयुक्त
वार्षिक वर्गणी : २० रुपये
एका अंकाची किंमत : ४ रुपये

पत्रव्यवहाराचा पत्ता :
रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
ई/५, प्राध्यापक निवास
पुणे विद्यापीठ
पुणे ४११ ००४.

**संपादक मंडळ**

जगदीश गोडबोले

रामचंद्र मुटाटकर

**संपादन साहाय्य**

सुधीर जोग

प्रकाशक :
प्रा. रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांनी
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यासाठी
साप्ताहिक मुद्रण,
१०२५ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०,
येथे छापून प्रसिद्ध केले.


## संपादकीय

गेल्या तीन वर्षांत ‘ हाकारा ’मधून वनसंरक्षण, वनसंवर्धन, वनविधेयक इ. वनासंबंधीच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे साहित्य प्रसिद्ध करण्यात आले. आदिवासींच्या समस्यांना वाहिलेल्या परिषदेने व ‘ हाकारा ’ने आदिवासींचे पोट ज्या वनावर अवलंबून आहे त्यावर प्रामुख्याने भर देणे स्वाभाविक आहे. या अंकातदेखील वननीतीसंबंधी दोन लेख व एक पुस्तकपरिक्षण यांचा समावेश आहे.

वनव्यवस्थापनाचे उद्दिष्टच ब्रिटिश काळापासूनच सरकारी तिजोरी भरणे व उत्पादन वाढीसाठी व्यापारी हितसंबंध जपणे हेच राहिलेले आहे असे म्हटले जाते. तसेच त्यामुळे वनव्यवस्थापन व वतनकायदा याद्वारे लोकांच्या हितसंबंधांची जपणूक होत नाही, किंबहुना त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जाते असा आरोप केला जातो. अलीकडे वनविषयक चर्चाही एकूणच राष्ट्रीय विकासप्रकल्पांमुळे बिघडणारे ग्रामीण व आदिवासी भागातील निसर्ग व समाज संतुलन यावर केंद्रित झाली असल्यामुळे त्यास बहुशाखीय (multi-disciplinary) स्वरूप प्राप्त झाले आहे. यात पर्यावरणशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, सामाजिकशास्त्रे कायदा तसेच वैद्यकीयशास्त्रे यांचा अंतर्भाव होऊ शकतो, मानवशास्त्राच्या सर्वांगीण दृष्टीकोणातून वनांकडे केवळ अर्थव्यवस्थेचा एक भाग म्हणून न पाहता एकूणच मानवी संस्कृतीचा एक महत्त्वाचा पैलू म्हणून पाहिले जाते. नैसर्गिक व सामाजिक शास्त्रांच्या सहभागामुळे मानव व पर्यावरण यांच्यातील संबंधांचे सर्वांगीण अध्ययन होऊ लागले आहे ही निश्चितच स्वागतार्ह घटना आहे.

जनतेचा सक्रिय सहभाग विकासकार्यात असावा असे वारंवार म्हटले जाते; परंतु लोकशाही चौकटीत व्यापारी हितसंबंधांचे शासनावरील दडपण व सरंजामशाही, धर्म, अंधश्रद्धा यांचा विलक्षण पगडा असलेला अशिक्षित समाज ही वस्तुस्थिती असताना विकासकार्यात जनतेचा अर्थपूर्ण सहभाग खरोखर शक्य आहे काय ? लोकशाही चौकटीत तो मिळवायाचा असेल तर लोकशिक्षणाला पर्याय नाही. वनासंबंधी मांडण्यात येणारे विविध विचार सर्वसामान्यांपर्यंत कितपत पोहचतात याविषयी शंकाच आहे. लोकशिक्षणासाठी पथदर्शक कार्यक्रम, प्रयोग कितीसे आहेत ? याबाबतीत शासकीय प्रयत्न तर अपुरे आहेतच; परंतु स्वयंसेवी संस्थानाही यासंबंधी बरेच काही करता येण्यासारखे आहे. शासनामध्ये कर्तव्यदक्ष व कार्यक्षम अधिकारी आहेत; परंतु त्यांनाही प्रशासकीय अडचणी व राजकीय दबाव यामुळे जनहिताचे कार्यक्रम राबविता येत नाहीत. त्यांनी प्रशासनाची तांत्रिक बाजू लोकशिक्षणाकरिता जनतेसमोर वारंवार मांडावयास हवी. स्वयंसेवी संस्था व वनप्रशासन यांच्यात अलीकडेच संवाद होऊ लागला आहे; परंतु तो अनौपचारिक पातळीवरच आहे त्यास संस्थात्मक स्वरूप प्राप्त होणे निकडीचे आहे. या संदर्भात लोकशिक्षणाचे प्रयोग करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांनी व कार्यकर्त्यांनी हे प्रयोग ‘हाकारा’-च्या माध्यमातून लोकासमोर मांडावेत.

विकासकार्यात लोकांचा सहभाग वाढला पाहिजे असे वारंवार म्हटले जात असले तरीही वननीती आणि पर्यायाने एकूणच विकासनीती ठरविताना सामान्य जनतेला विश्वासात घेतले गेले पाहिजे यासाठी संघर्षात्मक चळवळ उभारण्याची निकड भासू लागली आहे हेही नाकारता येणार नाही. एकंदरीत पाहता कोणत्याही समाजाची प्रगती व्हायची असेल तर प्रस्थापितांविरुद्ध चळवळ उभारावी लागते. अशा प्रकारच्या चळवळींबाबत दोन लेख अंकात आहेत. प्रगत समाज हा अप्रगत समाजाच्या संस्कृतीस दुय्यम लेखतो व आपली संस्कृती या समाजावर लादण्याचा प्रयत्न करतो. असे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी सामाजिक चळवळींची नितांत आवश्यकता असते. बऱ्याचशा चळवळी स्थानिक पातळीवर चालत असल्याने त्यांची नीट ओळख इतरांना होत नाही; परंतु राष्ट्रीय इतिहास घडण्यामागे या चळवळींनाही बरेच महत्त्व असते. सामाजिक कार्यकर्त्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात स्थानिक इतिहास व स्थानिक चळवळी यांचा अभ्यास करून त्या पुढे रेटण्याचा सतत प्रयत्न करीत राहणे हे समाजपरिवर्तनाच्या दृष्टिकोणातून फार महत्त्वाचे आहे.



# पुरोगामी वननीती कशी असावी ?

**माधव गाडगीळ**

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, बंगलोर–५६००१२

**दोन** वर्षांमागे ठाणे जिल्ह्यातल्या जव्हारला गेलो होतो तिथल्या काही उत्साही आणि सचेतन कार्यकर्त्यांची माहिती करून घ्यायला. मंडळींना गाण्या-बजावण्याचा शोक होता. रात्री कार्यक्रम सुरू झाला. त्यांची स्वतः-चीच रचना होती.

आम्ही जंगलचे राजे, इथे उपाशी मरतो ! आणिक तिकड पुंजीपती तो आपली तिजोरी भरतो– जंगल चोरून, जंगल चोरून !!

अगदी तल्लीन होऊन गात होते. त्यांना तरी हे गाणे म्हणजे आजच्या वननीतीचे सार होते. आणि मीही विचारात पडलो. वनवासी लोक उपाशी उघडे वाघडे होते हे तर निःसंशयच होते. गेले पाच दिवस त्यांच्या-शीच संपर्क होता. दांडेलीच्या कागदगिरणी मालकांनी आणि इतर अनेकांनी तिजोऱ्या भरलेल्या मी वर्षानुवर्षे पहात होतोच जंगल चोरूनच नव्हे, तर साळसूदपणेही, याचे अनेक मार्ग होते. टनाला पंधरा रुपयासारखे जवळजवळ फुकटातले दर सरकारी जंगल मालाला देऊन, बांबू तोडणाऱ्या मजुरांना वेगळ्या कंपनीचे तात्पुरते नोकर ठेऊन अगदी कमी वेतन देऊन, कार-खान्याच्या प्रदूषणामुळे काळी नदी काठच्या शेतीची– गुराढोरांची मोठी हानि होत असताना त्यावर एक पैसाही खर्च न करता अशा अनेक मार्गांनी पुंजीपती वनोद्योगांवर प्रचंड नफा मिळवत होते. या उप्पर चोरी मारी चालली होती ती अलाहिदा; पण आपली तिजोरी भरायला पुंजीपतीला जंगल बेकायदेशीर चोरायची खास गरज नव्हती, आणि नाही. पुंजीपतींची प्राप्ती आणि आर्थिक सत्ता वाढण्याची, आणि समाजाच्या खालच्या स्तरावरच्या लोकांची गरिबी अधिकच तीव्र होण्याची देशभर जी प्रक्रिया चालू होती, त्याचाच एक भाग वन व्यवस्थापन होते. ग्रामीण भागातल्या रयतेला नाडून, त्यांच्या वननिर्भर गरजा नाकारून वनदोह-नाचा सर्व फायदा संपन्न वर्गांना देऊन गरीब-श्रीमंतां-तली दरी आणखीच खोल केली जात होती.

## केवळ स्थानिक रहिवाशांसाठीच

ही प्रक्रिया आपण बदलायला तर हवीच आहे; पण कशी बदलणार ? चिपको विख्यात सुन्दरलाल बहु-गुणाजी एक मार्ग सुचवतात. त्यांच्या मते वनसंपत्ती ही केवळ स्थानिक रहिवाशांच्या दैनंदिन गरजा, जळण, चारा, बांधकामासाठी, शेतीच्या अवजारांसाठी लाकूड, शेतासाठी खत इत्यादि पुरवण्यासाठी राखून ठेवली पाहिजे. वनाधिष्ठित उद्योगधंदे, लाकडाचा व्यापार पूर्ण थांबवला पाहिजे. असे केल्यावर स्थानिक जनतेची स्थिती सुधारेल, वनसंपत्तीचा नाश थांबेल, आणि इतर देशासाठी पुरांसारख्या समस्या, ज्या वनविनाशाने निर्माण होतात, त्याही कमी होतील.

हा दृष्टिकोन विचारार्ह निश्चित आहे. इतरही अनेक चळवळींतून वनरहिवाशांच्या पारंपरिक गरजा पूर्ण होत राहण्यावर, जुने हक्क शाबूत राहण्याबर भर आहे. परंतु आजच्या परिस्थितीत ही जुनी उपयोग पद्धति दूरदृष्टीने विचार करता इष्ट आहे का ? का बदलत्या परिस्थितीत जुने सर्व हक्क राखून जंगल वापरण्याचा प्रयत्न केल्यास सर्व औद्योगिक, व्यापारी मागण्या थांबवूनही जंगलाचा नाश अटळ आहे ? वन विभागांचे एक मताने म्हणणे आहे की, लोकांच्या पारांपरिक वापरानेच जंगलाचा मोठा नाश होत आहे, हा वापर असाच चालू ठेवणे अशक्य आहे. हे म्हणणे संपूर्णपणे चुकीचे आहे का ? माझ्या मते या जंगलखात्याच्या मतात बरेच तथ्य आहे. आज जर सर्व पारंपरिक हक्क आणि उपयोगपद्धति चालू ठेवल्या तर लोक पोट भरण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लाकडाच्या मोळ्यांचा धंदा सुरू ठेवतील. आज देशात जळणाला मागणी एवढी आहे की या सरपणाच्या व्यापारापुढे जंगल नष्ट होत राहील. आज जंगलाच्या सर्व अंतर्भागातही गुरे इतकी चरतात की, ही चराई अशीच चालू ठवली तर वनसंपत्तीचे पुनर्जीवन अशक्यप्राय आहे. अशा परिस्थितीत आपण जंगलाचे पारंपरिक वापर बदलणे अवश्य आहे.

पण सरकारी यंत्रणा ज्या पद्धतीचे बदल करण्यामागे आहे, ते बदल पूर्णपणे अन्याय्य आहेत. त्यांचा सर्व रोख स्थानिक जनतेला जंगलापासून दूर ठेऊन वन व्यवस्थापन अधिकच प्रमाणात व्यापारी, औद्योगिक हितसंबंधांच्या हातात देण्यावर आहे. या मार्गाने वन निवासी अधिकच नागवले जातील आणि त्यांच्या विरोधाचे रान पेटून ही नवी वनव्यवस्था त्या आगीत खाक होईल. आणि जर समजा ती दंडुक्याच्या जोरावर चालवलीच तर त्यायोगे जंगलभागातील दारिद्र्याचा, देशातील आर्थिक विषमतेचा प्रश्न अधिकच गंभीर होईल.

## पुरोगामी वननीती

मग जर पूर्वपरंपरा तशाच चालू ठेवणे शक्य नसेल व सध्याची वनव्यवस्थाही इष्ट नसेल तर काय करावे ? आजपावेतो जंगलमालावर आधारित असलेल्या उद्योगधंद्यांनी आणि व्यापारांनी स्थानिक जनतेला काहीच फायदा मिळवून दिला नाही, उलट जंगल संपत्तीचा नाश करून नाडलेय म्हणून हे उद्योगधंदे, व्यापार थांबवावेतच का ? आजपावेतो सागवान निलगिरीच्या लागवडीने स्थानिक जनतेला पीडाच झाली, म्हणून ही लागवडही पूर्णपणे थांबवावीच का ? जंगलखात्याचे व स्थानिक जनतेचे नाते नेहमीच शत्रुत्वाचे राहणार का ? असे अनेक महत्त्वाचे प्रश्न आपल्यापुढे ठाकलेले आहेत या अशा समस्यांची काही उत्तरे सुचवण्याचा आणि खऱ्या पुरोगामी वननीतीची रूपरेषा दाखवण्याचा प्रयत्न मी येथे करणार आहे.

ह्या समस्यांची उत्तरे शोधताना आपल्याला जंगलांच्या नाशाच्या इतिहासाचा थोडा विचार करणे उपयुक्त ठरेल. ब्रिटिशांनी शास्त्रोक्त वनव्यवस्था भारतात सुरू करण्यापूर्वी जंगलाचा मनसोक्त नाश होत होता, आणि आज जे काही जंगल थोडे फार टिकून आहे ते राखीव जंगलात शास्त्रोक्त व्यवस्थापनेमुळे टिकून आहे, एरवी राखीव जंगलांबाहेर झाला तसा सर्वत्रच जंगलांचा नाश झाला असता असे पुष्कळदा प्रतिपादित करण्यात येते. हे प्रतिपादन कितपत बरोबर आहे ?

(१) **ब्रिटिशपूर्वकालात जंगलाचा मनसोक्त नाश होत होता** : ब्रिटिशांचा देशावर कब्जा येण्यापूर्वी देशातील वनसंपत्ति किती तरी पटींनी जास्त समृद्ध होती. याला दोन कारणे असू शकतील : एक तर त्या काळात कमी लोकसंख्या असल्याने व औद्योगीकरणापूर्वी वनसंपत्तीला मागणी कमी असल्याने गैरव्यवस्थेतही टिकून असेल, किंवा या कमी मागणीबरोबरच वनसंपत्तीच्या व्यवस्थेच्या पूर्वपरंपरा शहाणपणाच्या व योग्य असतील. माझ्या मते हे दोनही होते. जुन्या काळच्या एकसंध, स्वतंत्र ग्रामव्यवस्थेत परिसरातील वनसंपत्तीच्या चांगल्या वापराच्या व ती टिकवून धरण्याच्या अनेक परंपरा होत्या. उदाहरणार्थ, देवरायांमुळे, वडा–पिंपळाची झाडे न तोडण्यामुळे, सामुदायिक जंगलात प्रत्येक कुटुंबाने मर्यादित वापर केल्यामुळे आजपावेतो अनेक ठिकाणी वनसंपत्ती टिकून आहे. पूर्वी तर अशा परंपरा खूपच जास्त असतील. पूर्वीचे राजेही वनसंपत्तीचा नियंत्रित वापर करीत असत. यासंबंधात आंब्या–फणसांची झाडे न तोडण्याबाबतचे शिवाजीचे आज्ञापत्र प्रसिद्ध आहे. काहीही असो जंगलसंपत्तीचा प्रचंड विनाश झाला, तो ब्रिटिशांच्या कारकीर्दीत, त्यांच्या पूर्वी नाही हे तर अगदी

निर्विवाद आहे.

(२) **ब्रिटिशांनी वनव्यवव्यस्थापन अगदी शास्त्रोक्त पद्धतीने केले :** प्रथम सत्ता प्रस्थापित झाल्यावर ब्रिटिशांनी पहिली ५०–६० वर्षे भारतातील वनसंपत्ती अगदी मनमुराद नष्ट केली. १८०० ते १८६० या काळात त्याला काहीही धरबंद नव्हता आणि याच सुमारास देशभरची जंगले एकदम कमी झाली. १८६० च्या सुमारास ब्रिटिशांनी मोठ्या प्रमाणावर रेल्वेमार्ग बांधायला सुरुवात केली आणि आगगाडीच्या रुळांच्या लाकडी पट्ट्यांसाठी लाकडाला खूप मागणी आली. जेव्हा अशी मागणी आली तेव्हा मनमुराद वापराने जंगल टिकणे शक्यच नाही हे ब्रिटिशांच्या ध्यानात आले आणि त्यांनी शास्त्रोक्त वनव्यवस्थेचा विचार सुरू केला.

## शास्त्रोक्त व्यवस्थापन

शास्त्रोक्त व्यवस्थापन म्हणजे काय ? तर अमुक–अमुक पद्धतीने वनसंपत्तीचा वापर केला तर कायम स्वरूपात जास्तीत जास्त लाभ होईल हे ठरविणे. यासाठी भरपूर शास्त्रीय माहितीची जरुरी आहे आणि या व्यवस्थेमागची गृहीततत्त्वे प्रत्यक्षात खरी असायला पाहिजेत. उदाहरणार्थ अमुक व्यासाच्या अमुक जातीच्या झाडांची अमुक वर्षांनी तोड केली की, झाडांची वाढ सर्वांत चांगली होईल अशा पद्धतीची माहिती पाहिजे. तसेच खरोखरच अशीच तोड होत आहे हे गृहीततत्त्व प्रत्यक्षात उतरायला पाहिजे. हे युरोपात ठीक होते. तेथे जंगले अगदी साध्या रचनेची, काही दोन–चार जातींचीच अशी आहेत व तेथे जळण, चराई वगैरेसाठी इतकी मोठी जरूरही नव्हती. त्यामुळे युरोपात अशा पद्धतीच्या शास्त्रोक्त वनव्यवस्थापनेची खरीखरी शक्यता होती. आपल्या देशातील अगदी वेगळ्या प्रकारच्या जंगलांत, अपुऱ्या माहितीवर व लोकांच्या प्रचंड गरजेपुढे खरोखरीचे शास्त्रोक्त व्यवस्थापनही काही सोपी गोष्ट नव्हती. त्यामुळे ब्रिटिशानी शास्त्रोक्त व्यवस्थापनाच्या नावाखाली खरे शास्त्रोक्त व्यवस्थापन मुळी सुरू केले नाहीच. त्यांनी अशा शास्त्रोक्त व्यवस्थापनाचा सांगाडा युरोपातून आयात केला आणि त्या बिनमासाच्या सांगाड्याचा बागुलबुवा उभा करून देशातील मोठ्या जमिनीच्या हिश्श्यावर आपला कब्जा प्रस्थापित केला. हे तथाकथित शास्त्रोक्त व्यवस्थापन सुरू होऊन १२० वर्षे झाल्यावर आजसुद्धा या सांगाड्यावर फारसे मांस चढलेले नाही. आजसुद्धा आपल्याला नक्की किती जमीन जंगलखात्याच्या ताब्यात आहे, त्या जमिनीवर किती वृक्षभार आहे, त्या वृक्षभाराची वार्षिक वाढ किती आहे, वेगवेगळ्या जातींची वाढ कशी होते, कोणत्या जाती कोठे लावाव्यात, एकजाती लागवडीवर पडणाऱ्या रोगांमुळे किती नुकसान होते अशा मूलभूत प्रश्नांची उत्तरे माहीत नाहीत. या माहितीच्या अभावी शास्त्रोक्त व्यवस्थापनाच्या गप्पा हे निव्वळ थोतांड आहे.

खरोखर शास्त्रीय व्यवस्थापनाच्या नावावर काय केले गेले तर लाखो एकर जमिनीवर सरकारी नियंत्रण आणि एकदा सरकारी नियंत्रण आले की, या जमिनीचा सरकारी तिजोरी भरण्यासाठी आणि समाजातील समृद्ध वर्गाचा फायदा करून देण्यासाठी वापर. हेच 'शास्त्रोक्त' व्यवस्थापन आजही चालू आहे.

(३) **राखीव जंगलाबाहेरची वनसंपत्ती अशास्त्रोक्त व्यवस्थापनामुळे नष्ट झाली :** शास्त्रोक्त व्यवस्थापनाचा अर्थ सर्व देशातील वृक्षसंपत्ती टिकून राहील अशी व्यवस्था लावणे असा खरा असायला हवा होता; परंतु ब्रिटिशांनी साहजिकच तसा लावला नाही. आपल्या देशातील लोक प्रचंड प्रमाणावर जंगलावर अनेक गोष्टींकरता अवलंबून होते. हा सर्व उपयोग कसा नीट चालेल हे पहायला हवे होते; पण तसे करण्यात आले नाही. त्यांच्या अशा उपयोगाकरता काही जमीन सोडून देण्यात आली; पण ती पुरेशी आहे का ? कशी वापरावी याचा काहीच विचार नव्हता. बहुतेक ठिकाणी ती अगदी अपुरी असावी. १८८० मध्ये व्होल्कर या कृषिशास्त्रज्ञाने इंग्रज सरकारासाठी एक भारतीय शेतीवर अहवाल लिहिला आहे. या अहवालात अनेक जागी अवास्तव जमीन राखीव जंगल बनवले गेल्याने भारतीय शेतीचे व पशुपालनाचे मोठे नुकसान होत आहे असा उल्लेख आहे. जर जंगलासारख्या पुनर्निर्माणक्षम संपत्ती वर भांडवलावरच्या व्याजापेक्षा जास्त मागणीचा भार पडला, तर ते भांडवलच खाऊन टाकले जाऊन नष्ट होते. राखीव जंगलाबाहेरच्या जंगलावर असाच अवास्तव बोजा पडून ते नष्ट झाले असावे.

शिवाय ब्रिटिश आमदानीत ग्रामीण लोकसंख्या एका बाजूला वाढत होती, तर लोकांचे दारिद्र्य दुसऱ्या बाजूला वाढत होते. त्याच्याच जोडीला जुनी ग्रामव्यवस्था मोडून त्यातील चांगल्या परंपरा नष्ट होत होत्या.

हे सर्व मिळून येऊन राखीव जंगलाबाहेरच्या जमिनीवरच्या वृक्षसंपत्तीचा भराभर विनाश झाला. तो काही केवळ लोक मूर्ख आणि बेजबाबदार होते म्हणूनच झाला असे नाही. उलट तथाकथित 'शास्त्रोक्त' व्यवस्थापनात अतोनात जमीन राखीव केल्यामुळे झाला असावा असेही संभवते.

(४) **शास्त्रोक्त व्यवस्थापनात वनसंपत्ती व्यवस्थित राखली गेली आहे** : आज देशात जी काही वनसंपत्ती टिकून आहे ती बहुतांशी राखीव जंगलात आहे हे निश्चित. अर्थात हे संपूर्ण खरे नाही. हिमालयातल्या वनपंचायतीत, सह्याद्रीवरल्या देवरायांत, कॉफीच्या मळ्यातील डोंगरांच्या वरच्या भागातील जंगलात, केरळातील संस्थानिकांच्या जंगलात अशा अनेक ठिकाणी राखीव जंगलाबाहेरही जंगल चांगले टिकून होते; पण एकूण क्षेत्रफळाच्या दृष्टीने हे अगदी थोडे होते; पण जे जंगल राखीव आहे, त्यावरची वनसंपत्तीही काही खास चांगली राखली गेलेली नाही. आपल्या ७.५ कोटी हेक्टर राखीव जंगलातील ३ ते ४ कोटी हेक्टर जमीन बहुतांश उघडी-वाघडी आहे. या जमिनीवर एकूण किती वृक्षभार आहे याची निश्चित माहिती नाही; परंतु सरासरी वृक्षभार ३२ घनमीटर।हेक्टर आहे आणि प्रतिवर्षं वृक्षोत्पादन १ घनमीटर।हेक्टर असा अंदाज आहे. म्हणजे जमिनीच्या खऱ्या क्षमतेपेक्षा वृक्षभार आणि वृक्षोत्पादन फार तर ५ ते १० टक्के आहे.

हे उत्पादन सुधारण्यासाठी नव्या नव्या लागवडींचे प्रयत्न झाले, त्यांच्याही यशस्वितेबद्दल फारशी माहिती नाही; परंतु जी काही उपलब्ध आहे त्यावरून तेही फारसे यशस्वी नाही. उदाहरणार्थ निलगिरी झाडांची लागवड करताना प्रतिवर्ष ७ ते २० टन उत्पादन हेक्टरी होईल अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात ते १ ते ३ टनच पडते. शिवाय हजारो हेक्टरावर बुरशीचा रोग पडून निलगिरीची धूळधाण झालेली आहे. बस्तरात मोठा गाजावाजा करून पाइन लावला, त्याचीही अशीच स्थिती आहे.

**वनसंपत्तीच्या या दुर्दशेचे मुख्य कारण आहे. गेल्या दीडशे वर्षांतील वनव्यवस्थेचे उद्दिष्ट. हे उद्दिष्ट सरकारी तिजोरी भरणे आणि संपन्न नागरवर्गाला, उद्योगपतींना, व्यापाऱ्यांना फायदा करून देणे. त्यामुळे स्थानिक वनवासी या व्यवस्थेचे प्रमुख शत्रू बनलेले आहेत. त्यांची महत्त्वाकांक्षा राहिली आहे एकच. ती म्हणजे जंगल तोडून शेती करणे. वनव्यवस्थेत त्यांचा पूर्ण असहकार आहे.**

१९२० च्या सुमारास कुमाओत जेव्हा राखीव जंगलाची हद्द आणखी वाढवण्याचा विचार आला तेव्हा तिथल्या लोकांनी सत्याग्रह करून लाखो एकर राखीव जंगल जाळून टाकले. शेवटी सरकारला माघार घ्यावी लागली. आजही सिंगभूममध्ये आदिवासी नवी लागवड झालेले साग, उभे राखीव जंगल रागाने तोडून टाकतात ! ज्या उद्योग-व्यापाऱ्यांसाठी ही संपत्ती वापरली जाते आहे, ते तरी तिचा चांगला वापर करीत आहेत का ? नाही. उलट शक्य तितका फायदा उपटण्यासाठी ते तिचा नाशच करीत आहेत. त्यांचा सर्व प्रयत्न कमीत कमी दरात जास्तीत जास्त माल मिळवण्याचा आहे आणि ज्यांच्या ताब्यात ही वनसंपत्ती आहे ती नोकरशाहीही मुख्य प्रयत्न करत आहे स्वतःची सत्ता टिकवून धरण्याचा ! सतत होणाऱ्या बदल्या, चांगल्या कामाची चाड नसणे आणि वाईट कामाबद्दल शिक्षा न होणे, राजकीय आणि पैशाचा दबाव या साऱ्या प्रकारात ही नोकरशाहीही विशेष काही करून दाखवू शकत नाही.

## क्षमतेच्या १० टक्केच उत्पादन

अशा या व्यवस्थेत साहजिकच आपली वनसंपत्ती प्रचंड प्रमाणावर नष्ट झाली आहे. आपल्या २७ कोटी हेक्टर जमिनीपैकी जवळजवळ ९ कोटी हेक्टर जमीन पडीक, निरुत्पादक आहे. नांगराखाली असलेल्या १४ कोटी हेक्टरपैकी ८ कोटी हेक्टर जमीन मातीच्या धुपेने हळूहळू नष्ट होत आहे. यातील ३ कोटी हेक्टर तरी खरोखर शेतीतून काढून वनशेतीखाली घ्यायला हवी आहे. आपल्या जंगलखात्याच्या ताब्यातील ७.५ कोटी हेक्टर जमिनीपैकी ३-४ कोटी हेक्टर पूर्ण निरुत्पादक आहे आणि उरलेल्या ३-४ कोटी हेक्टरांतून क्षमतेच्या १०-२० टक्केच उत्पादन होत आहे. हे जे उत्पादन आहे, ते आपल्या जनतेच्या अथवा उद्योगधंद्यांच्या कोणत्याच गरजा पूर्ण करू शकत नाही आणि त्यामुळे या अतोनात कापणीमुळे वनसंपत्तीचे भांडवल दिवसेंदिवस घटत आहे.

या परिस्थितीत जे तुटपुंजे उत्पादन आहे त्यातून ग्रामीण जनतेची, शहरातील जनतेची किंवा उद्योग-

धंद्यांची–कोणाचीच गरज पुरी होणे शक्य नाही; परंतु हे उत्पादन निदान पाच–दहा पट वाढवणे पूर्ण शक्य आहे. तसे झाले तर या सर्वांच्याच गरजा पुऱ्या होतील. हे उत्पादन आपण कसे वाढवू शकू हा आपल्या-पुढचा महत्त्वाचा प्रश्न आहे अर्थात हे उत्पादन वाढवणे हे केवळ एकच उद्दिष्ट आपल्यापुढे नाही. कारण सर्व उत्पादन हे लोकांकरता आहे. तेव्हा उत्पादन वाढवणे हे दुय्यम उद्दिष्ट, तर लोकांचे जीवनमान उंचावणे हे प्राथमिक उद्दिष्ट आहे आणि ज्या लोकांचे जीवनमान उंचावणे आवश्यक आहे, ते मुख्यत: ज्यांच्या मूलभूत गरजाही भागवल्या जात नाहीत असे ग्रामीण भागातील भूमिहीन अथवा छोटे शेतकरी आहेत. जेव्हा हे जंगलाच्या आसपास राहतात, तेव्हा ते पोट भरण्याकरता लाकूडफाटा विकण्याचा किंवा चार गुरे किंवा बकऱ्या पाळण्याचा व्यवसाय करतात. त्यांच्या या व्यवसायामुळे जंगलाचे मोठे नुकसान होत आहे हे निश्चित; पण दुसऱ्या रोज-गाराच्या अभावी ते मजबूर आहेत. जर आपल्याला जंगलाचे उत्पादन खरोखर पाच–दहा पट वाढवा-वयाचे असेल, तर या लोकांच्या स्वत:च्या जळण-चाऱ्याच्या गरजा भागवून, त्यांना नीट रोजगार निर्माण करूनच वाढवता येईल. त्याशिवाय ते कदापि शक्य नाही.

## वन व्यवस्थापन लोकांकडे सोपवावे

हे जर व्हायचे असेल तर वनव्यवस्थापन हे नोकर-शाहीच्या व व्यापारी–उद्योगपतींच्या हातातून काढून लोकांच्या हाती सोपवायला पाहिजे. ही काही सोपी गोष्ट नाही. कारण आज सर्व सत्ता याच वर्गांच्या हातात एकवटली आहे आणि ते सर्वसामान्य जनतेला शत्रुत्वाच्या नात्याने, मग्रुरीने वागवतात. लोकांनाही या वर्गाबद्दल विश्वास नाही आणि ते सरकारी योजनेबाबत नेहमी साशंक राहतात आणि रोजगार–हमीसारख्या चांगल्या योजनांचीही गैरव्यवस्थेमुळे धूळधाण होते असा त्यांचा जिवंत अनुभव आहे. तेव्हा सरकारी योजनांच्या भानगडीत पडण्याऐवजी स्वत:च स्वतंत्रपणे जमिनीचा एखादा तुकडा तरी कसावा अशी त्यांची इच्छा असते. त्यामुळे आजचा वनव्यवस्थापनाबद्दलचा वाद हा मुख्यत: लोकांनी जंगल जमीन कसण्याचा, गुरे चार-ण्याचा, लाकूडफाटा गोळा करण्याचा हक्क अबाधित रहावा असा आग्रह आणि नोकरशाहीचा हे हक्क रद्द-बातल करण्याचा आग्रह असा झाला आहे. लोकांची स्वायत्त राहण्याची इच्छा ही पूर्णत: नैसर्गिक व योग्य आहे; परंतु दुर्दैवाने सर्व लोकांनी स्वायत्ततेने असा उपयोग करीत राहिल्यास आपली वनसंपत्ती लवकरच नष्ट होईल अशी परिस्थिती आहे. आज आपल्या देशा-तील वृक्षोत्पादन फार तर ६–७ कोटी घनमीटर आहे, तर केवळ जळाऊ लाकूडच जंगलातून १०–११ कोटी काढले जाते असा अंदाज आहे. जिथे हेक्टरला १–२ गुरे चारली जायला हवीत तेथे १०–२० चारली जात आहेत. अनेक ठिकाणी लोक उभे डोंगर कसून ते भराभर उघडे–बोडके करीत आहेत. अशा परिस्थितीत लोकांना जंगलाचा व इतर जमिनींचा मनमुराद वापर करू देणे पाच–दहा वर्षांचा विचार केला तरीसुद्धा अशक्य आहे.



**तेव्हा आज वन–निवाशांना आपले अनेक परंपरागत हक्क सोडून देणे अटळ आहे. ते सोडले नाहीत तर उरलीसुरली वनसंपत्तीही नष्ट होईल आणि शिल्लक राहिलेले हक्क पोकळ होतील; पण दुसरे कोणतेच हक्क न मिळवता केवळ हे हक्क नष्ट करण्याचा आज जो प्रयत्न सुरू आहे, तो सर्वथा अन्याय्य आहे आणि तो हाणून पाडला पाहिजे. अर्थात सर्वच चित्र केवळ असे एकतर्फी नाही. गेली काही वर्षं चिपको आंदोलना-सारख्या आंदोलनांमुळे किंवा गुजराथसारख्या प्रागतिक प्रांतात वनविभागाच्या प्रयत्नांमुळे असे नवे प्रघात निर्माण होत आहेत, हेच आपल्याला पुष्कळ पुढे न्याव-याला पाहिजेत आणि त्यातूनच वननीती खऱ्या प्रगती-पथावर येईल !**

या नव्या वननीतीचे मुख्य घटक पुढील असावेत –

(१) आपल्या भूमीचे उत्पादन प्रथमतः जनतेच्या मूलभूत गरजा–जळण, चारा, निवारा, खत–पुरे करण्याकडे वापरले पाहिजे.

(२) या वृक्षोत्पादनातून भूमीहीनांना व छोटया शेतकऱ्यांना हमीचा रोजगार मिळाला पाहिजे.

(३) आज वनव्यवस्थेत जनतेला काहीही भागीदारी नाही. ते यात केवळ कधीकधी तुटपुंजा रोजगार मिळवतात, एवढेच. याउलट यापुढे ते वनसंपत्तीच्या उत्पादनात, संरक्षणात, तोडणीत, वाहतुकीत, व्यापारात व औद्योगिक प्रक्रियांत भागीदार झाले पाहिजेत व या सर्व क्षेत्रातील फायद्याचा मोठा हिस्सा त्यांचे उत्पन्न–राहणीमान वाढविण्याकडे गेला पाहिजे.

(४) वनसंपत्तीच्या उत्पादनाचा भर हा आज निरुत्पादक असलेली जमीन वनशेतीखाली आणण्याकडे असला पाहिजे. आजचे चांगले उभे जंगल तोडून त्यावर नवी लागवड करण्याकडे नको.

(५) नव्या वनव्यवस्थेत परिसराच्या संरक्षणाचा, जमिनीची धूप थांबवण्याचा, आपल्या वनस्पत्ती–प्राणीसृष्टीची विविधता टिकवून धरण्याचा विचार महत्त्वाचा समजला पाहिजे.

(६) हे सर्व करीत असताना नोकरशाहीच्या हातात अधिकाधिक सत्ता केन्द्रित होणार नाही, तर उलट लोकांची स्वायत्तता शक्य तेवढी अबाधित राहील असे पाहिले पाहिजे.

(७) हे हक्क मिळाल्यावर वननिवाशांनी जंगलाचा परंपरागत अमर्यादित उपभोग सोडून दिला पाहिजे.

## इंधन टंचाईला पर्याय

आज वनोत्पादनाचे प्रमुख उद्दिष्ट सरकारी तिजोरी भरणे हेच असल्याने सागवानासारख्या झाडांची लागवड प्रामुख्याने होते; पण आजच्या भडकलेल्या किंमतीत सागवान केवळ चैनीचा जिन्नस झाला आहे. त्याच्या जागी महागाईच्या बांधकामातही पोलाद, हार्डबोर्ड इत्यादी पर्यायी सामग्री सहज उपलब्ध आहे. याउलट देशात जळणाइतकी कोणत्याच गोष्टीची टंचाई नसताना जळाऊ लाकडाची लागवड फारशी होत नाही. जनावरांच्या चाऱ्याची स्थिती तर याहून वाईट आहे. दूधउत्पादन वाढवणे म्हणजे शहरी जनतेचा दूध पुरवठा वाढवणे असे समीकरण झाले आहे आणि जनावरांच्या चाऱ्याचा कोणी फारसा विचारच करीत नाही.

तिसरा महत्त्वाचा प्रश्न निवाऱ्याचा. बांबू–कळकासारख्या साधनांचा उपयोग करून स्वतःची उत्तम घरे लोक स्वतः बांधू शकतात; पण आज या सामग्रीचा प्रचंड तुडवडा आहे. एकेक मोठा कळक ४० रुपयांपर्यंत पडू लागला आहे. घरे शाकारण्यासाठीही पुरेशी झावळी मिळेनाशी झाली आहे. तर या जनतेच्या प्राथमिक गरजा पुरवणारी, जळण–चारा–निवारा पुरवणारी योग्य ती झाडे–झुडपे–गवते निवडून त्यांचे उत्पादन व सर्वसामान्य जनतेला रास्त दरात त्यांचा पुरवठा हे अग्रहक्काने केले गेले पाहिजे.

अर्थात हे करताना निलगिरी व इतर औद्योगिक वनोत्पादन थांबवावे असा माझा आग्रह नाही; परंतु जोवर आपल्याला लोकांच्या मूलभूत गरजा पुऱ्या करता येत नाहीत. तोवर त्या पुऱ्या करण्याला अग्रक्रम व औद्योगिक गरजांना दुय्यम क्रम दिला पाहिजे. सागवानासारख्या चैनीच्या गोष्टींना साहजिकच तृतीय क्रम मिळायला हवा. आज परिस्थिती याच्या बरोबर उलटी आहे.

बेरोजगारी ही आपल्यापुढील सर्वात जटिल समस्या आहे. जोवर आपल्याला आपल्या प्रचंड व वाढत्या लोकसंख्येला पुरेसा रोजगार पुरवला जाणार नाही, तोवर पोटाची खळगी भरण्याच्या त्यांच्या प्रयत्नात ते आपल्या निसर्गसंपत्तीची धूळधाण करीत राहणारच. तेव्हा ही समस्या सोडवल्याखेरीज निसर्गरक्षणाचा, वनसंवर्धनाचा विचारही शक्य होणार नाही. स्वातंत्र्यानंतरच्या औद्योगीकरणातून हा प्रश्न सुटलेला नाही. याच औद्योगीकरणाच्या मार्गाने पुढे जाऊन तो सुटेल अशी शक्यताही दिसत नाही. या समस्येवर आज तरी एकच उपाय दिसतो आहे आणि तो म्हणजे ही शक्ति आपल्या प्रचंड निरुत्पादक भूमीला आणि अशी भूमी ९–१० कोटी हेक्टर असावी– उत्पादक करण्याकडे लावणे.

## वनवासींना भागीदारी द्यावी

हे जर यशस्वी व्हावयाचे असेल तर या माणसांना केवळ तात्कालिक रोजगार पुरवून होणार नाही. कारण तसे केल्यास ती जमीन खरीच उत्पादक झाली किंवा न झाली तर त्याचे सोयरसुतक असणार नाही. उलट त्यांचे त्या जमिनीशी कायमचे नाते जोडून दिल्यास पुढच्या उत्पादनाची त्यांना तिडिक राहील व हा प्रयोग

यशस्वी होऊ शकेल आणि हे तत्त्व केवळ पडीक जमिनी-पुरतेच नाही तर इतरही वनोत्पादनाला लावायला लागेल. जर आजच्या उलट परिस्थिती निर्माण होऊन स्थानिक वननिवाशांना तेथील वनोत्पादनातून खरोखरचा वैयक्तिक लाभ होण्याचा संभव निर्माण झाला, तरच त्यांच्या सहकार्याने वनोत्पादन वाढविता येईल. यासाठी वननिवाशांना उत्पादन, संरक्षण, संग्रहण, व्यापार आणि प्रक्रिया या सर्वच बाबतीत भागीदारी दिली पाहिजे.

लाकूड आणि चारा उत्पादनात जनतेला भागीदारी देणे तीन संदर्भात पाहिले पाहिजे. खाजगी सुपीक जमिनीवर, खाजगी नापीक जमिनीवर. जोवर उद्योग-धंद्याना वनविभागाकडून अत्यंत स्वस्तात लाकूड मिळत होते, तोवर ते पिकवणे कोणाच्याच फायद्याचे नव्हते; पण गेल्या पाच-दहा वर्षात जंगलखात्याकडचा हा स्वस्त पुरवठा आटल्याने लाकडाचा भाव एकदम चढला आहे. त्यामुळे आज रेयॉन कारखान्यासाठी अथवा बांध-कामाच्या उद्योगासाठी निलगिरी अथवा कॅश्युरीना शेतावर पिकवणे हा मोठा किफायतशीर--उसाहूनसुद्धा जास्त--व्यवसाय बनला आहे आणि सर्व भारतभर अनेक शेतकरी आपली चांगली पाण्याखालची जमीनसुद्धा वृक्षोत्पादनासाठी वापरू लागले आहेत. ही प्रवृत्ती वाढतच राहील; परंतु आपली खरी समस्या सुपीक नव्हे तर नापीक जमिनीची आहे. देशभर शेतकरी केवळ उपजीविकेसाठी डोंगराळ, खडकाळ, पाणथळ झालेल्या जमिनीतून दोन-चार क्विंटाल धान्याचे पीक काढतात. ही नापीक जमीन अशा शेतीने अधिकाधिकच खराब होत जाते. अशा खाजगी मालकीच्या जमिनीवर वृक्षो-त्पादन सुरू करणे चांगले; पण ते करायचे तर त्या जमीनमालकाला शेतीतून जे दोन चार क्विंटल धान्य व कडबा मिळतो, त्यांची भरपाई करायला हवी. यासाठी गुजराथ सरकारने एक योजना आखली आहे या योजनेत शेतकऱ्याला त्याच्या मालकीच्या डोंगराळ जमिनीत वनशेती करण्यासाठी दर हेक्टरमागे २५० रुपये मिळतात. हे पंधरा वर्षे मिळत राहतील व जेव्हा पंधरा वर्षांनी झाडाची तोड केली जाईल, तेव्हा पूर्ण उत्पन्न त्याचे होईल.

तितकाच महत्त्वाचा प्रश्न सार्वजनिक निरुत्पादक जमिनीचा. याबाबत दोन प्रकारचे प्रयोग झालेले आहेत. मफतलाल गटाच्या लोकांनी व विशाखापट्टणम् जवळच्या भागवतुला विश्वस्त निधीच्या लोकांनी अशा जमिनीत एका हेक्टरात लाकूड आणि चारा उत्पादन करणाऱ्या झाडांचे व गवताचे संयुक्त उत्पादन करून व दूध चांगले देणारी संमिश्र गाय वापरून एका कुटुं-बाला पाच हजार रुपयांचे उत्पन्न मिळेल अशी योजना बनवली आहे. अशा योजनेचे काही प्रयोग उत्तरप्रदेश व गुजराथेत झाले आहेत. पहिली काही वर्षे सहाय्य मिळाल्यास पाच वर्षानंतर ते कुटुंब स्वयंपूर्ण बनेल अशी अपेक्षा आहे.

### रोप वनांची योजना

अशा जमिनीबाबत दुसरी योजना म्हणजे गुजराथ सरकारची सामाजिक सुरक्षा रोपवनांची योजना या योजनेत दहा--बारा कुटुंबांना सामुदायिकरीत्या ४००--४५० हेक्टर लावगड करण्याची व त्याची सर्व देखभाल पाहण्याची जबाबदारी दिली जाते. प्रत्येक कुटुंबाकडून महिन्याला ४० मानवदिनांचे काम अपेक्षित असते व महिन्याकाठी तेवढ्या दिवसांचे वेतन त्यांना मिळते. या वेतनापायी त्यांनी प्रतिवर्षी २५ हेक्टर वृक्षसंवर्धन करायचे. यांचे रोपे बनवण्याचे, खड्डे घेण्याचे, ताली बांधण्याचे, राखण्याचे, सर्व काम त्यांच्याकडे. पंधरा वर्षांनी जे नक्त उत्पादन होईल, त्याचा पाचवा हिस्साही त्या कुटुंबाला मिळेल. हा प्रयोग गेले पाच--सहा वर्षे गुजराथेत सुरू आहे. अजून फार कुटुंबे या योजनेत भाग



-यायला आली नाहीत; परंतु प्रयोगाची सुरुवात चांगली झालेली दिसते.

उत्पादनानंतर आले संरक्षण, हे दोन प्रकारचे हवे. स्थानिक जनतेपासून, मोळ्या गोळा करणाऱ्या व गुरे चारणाऱ्या आणि ट्रका-ट्रकांनी चोरी करणाऱ्यांपासून. स्थानिक जनतेपासून संरक्षण त्यांना वेगळा रोजगार मिळाला तरच होऊ शकेल आणि यासाठी वर उल्लेखलेले प्रयोग मोठ्या प्रमाणावर सुरू केले पाहिजेत; पण मोठ्या चोरांकडून संरक्षण मिळण्यासाठी स्थानिक जनतेला खासच भागीदार करता येईल. अशा ट्रकवाल्या चोरांकडून गुजराथेत दरवर्षी एखादा फॉरेस्टगार्ड ठार मारला जातो. यंदा त्यांनी असे ट्रक पकडण्यासाठी स्थानिक गाववाल्यांना सामील करून घेतले आहे. त्यांनी जर ट्रक पकडला, तर ट्रक जप्त होतो आणि पकडलेल्या मालाची अर्धी किंमत गाववाल्यांना मिळते.

## सहकारी संघांचा अनुभव

स्थानिक वननिवाशांना जंगलातून मुख्य रोजगार मिळतो, तो संग्रहणासाठी; लाकूड तोडणे, मध गोळा करणे, हिरडे गोळा करणे अशासाठी मिळणारा हा रोजगार तात्पुरता व अगदी बेताचा असतो. खरा सर्व फायदा मधले कंत्राटदार लाटतात. हे बदलण्यासाठी मुंबई राज्यात १९४८ मध्ये जंगल कामगार सहकारी संघ स्थापले गेले; परंतु या सहकारी संघांना जंगलखात्याकडून मन:पूर्वक सहकार्य कधीच मिळाले नाही. या सहकार्याच्या अभावी आणि संस्थेच्या संधिसाधू पदाधिकाऱ्यांच्या गैरव्यवहामुळे या संस्था फारच मर्यादित प्रमाणावर यशस्वी होऊ शकल्या आहेत. तथापि गुजराथेत डांगमध्ये त्या पुष्कळच चांगल्या उभ्या राहिल्या आहेत. तेथे जंगलातील सर्व लाकूडतोड सहकारी संस्थांमार्फत होते आणि प्रत्यक्ष मजुरीच्या पैशांखेरीज लाकडाची विक्री झाल्यावर २०% नफाही संस्थेच्या हाती येतो. या सहकारी संस्थांतून डांगचे आदिवासी नेतृत्व चांगले उभे राहिले आहे. या नेतृत्वाच्या आग्रहामुळे वननिवाश्यांना इतरही फायदे मिळत आहेत. उदाहरणार्थ, ३० किलोमीटरच्या आतील सर्व लाकूडवाहतूक खाजगी बैलगाडीतून होते आणि त्याचेही पैसे आदिवासींच्या हातात येतात.

गुजरात वनविकास नियोगाच्या कार्यातूनही वननिवाशांना संग्रहणाचा जास्त फायदा मिळण्याचा प्रयत्न आहे. उदाहरणार्थ बिडीपत्ता गोळा केल्यावर नियोग हा बिडीपत्ता मजुरी देऊन विकत घेते. नंतर विक्री केल्यावर जो नफा होतो त्याचाही हिस्सा पुन्हा सहकारी संघाला दिला जातो.

जंगलमालावर कुटीरोद्योग तसेच मोठे उद्योग आधारित आहेत. बांबूच्या बुट्टया विणणे हा त्यातील एक महत्त्वाचा कुटीरोद्योग. कागदगिरण्यांच्या अवास्तव बांबू तोडण्यामुळे आणि मध्यस्थांच्या नफेखोरीमुळे बुरुडांची स्थिति सगळीकडेच हलाखीची आहे. त्यांच्यासाठीही गुजरात वनविभागाने काही चांगल्या योजना काढल्या आहेत. उदाहरणार्थ, एका बुरुड-वसाहतीला त्यांच्याजवळचीच पडीक जमीन बांबू वाढविण्यासाठी दिली आहे. तेथे वाढलेले बांबू त्यांना वेतकामासाठी कायम फुकट मिळतील. तसेच बुरुडांच्या टोपल्या जंगलखात्यातर्फे रोख पैसे देऊन सुरतेसारख्या शहराच्या बाजारात विकण्याची सोय करण्यात आली आहे. यासाठी जंगलखाते काहीही कमिशन घेत नाही.

मोठ्या वनाधिष्ठित उद्योगांमुळे स्थानिक निवाशांना ताप भरपूर झालेला आहे – प्रदूषणाचा, जंसलसंपत्तीचा नाश होण्याचा पण कधीच काही फायदा झालेला नाही. याला अपवाद अलीकडचाच आणि एकच. तो म्हणजे जंगलातील कच्चा माल संपल्यावर आज काही रेयॉन-कारखाने वगैरे शेतकऱ्यांना निलगिरीची झाडे पिकवण्यासाठी पैशाची मदत करू लागले आहेत. त्यामुळे काही शेतकऱ्यांचा फायदा होत आहे. याबाबत बस्तर पाइन रोपवन प्रकल्पाबद्दलच्या समितीने काही चांगल्या सूचना केल्या आहेत. त्यांच्या सूचनेप्रमाणे नव्या वनाधिष्ठित उद्योगांत स्थानिक जंगलमजुरांना व स्वत:च्या अथवा सार्वजनिक जमिनीवर कच्च्या मालाचे उत्पादन करणाऱ्यांना भागधारक व्हायला मिळाले पाहिजे व त्या उद्योगाच्या नफ्याचा हिस्सा त्यांना मिळाला पाहिजे. एकूण यापुढे सर्व वनाधिष्ठित उद्योगांचा विकास छोट्या, सहकारी कारखान्यांद्वारेच होणे इष्ट आहे आणि तशी हालचाल केली पाहिजे.

अशा रीतीने अनेक मार्गांनी वनसंपत्तीचे उत्पादन; संरक्षण, संग्रहण, व्यवहार व प्रक्रिया या सर्वांत वननिवाशांना भागीदार या नात्याने मोठ्या प्रमाणात समाविष्ट करून घेतले पाहिजे. असे केले आणि त्यातून त्यांचा चांगला फायदा होऊ लागला तरच वनविकासाला त्यांचे सहकार्य मिळून ते कार्यक्रम यशस्वी

होतील आणि अशा कार्यक्रमांतून त्या प्रदेशाचा खरा विकास होईल. या सर्व कल्पनांची लोकांना भीती वाटते. कारण या राबवण्यात नोकरशाहीचा आपल्या जीवनावरचा ताबा वाढेल असे त्यांना साहजिकच वाटते शिवाय यातील अंतर्भूत सहकारी संस्था गैरव्यवहारा-मुळे बट्ट्याबोळ करतील अशीही भीती आहे. जंगल-खात्यातील अनेकांना भीती वाटते की, एकदा लोकांचा चंचुप्रवेश झाला की, ते जमीन कसायला लागतील आणि सोडणार नाहीत. टौंग्या आणि इतर पद्धतीतील तशी उदाहरणेही आहेत. हे सर्व धोके संभाव्य आहेत हे खरेच; परंतु आज जी वनव्यवस्था आहे तिच्यातही अनेक गंभीर उणीवा आहेत. तिचेही कार्य काही खास चांगले चालले नाही आणि ज्या पद्धतीने ते चालले आहे त्यामुळे आपल्या विकासामागे जी काही सामाजिक उद्दिष्टे आहेत ती अजिबातच पुरी पडत नाहीत. अशा परिस्थितीत हे सर्व संभाव्य धोके डोळयां-समोर ठेऊन एक अगदी नवी वननीती आपल्याला करायला हवी आणि या वननीतीत वननिवासी हे वन-संवर्धनाचे पूर्ण भागीदार बनायला हवेत.

हे एक भविष्यातील मोठेच आव्हान आहे. हे कार्य केवळ सरकारी यंत्रणा केव्हाच करू शकणार नाही. केवळ असंघटित आणि अशिक्षित वननिवासीही करू शकणार नाहीत. हे यशस्वी होण्यासाठी स्वयंसेवी, ग्राम-वियासाच्या कार्यात रस घेणाऱ्या कार्यकर्त्यांचा आणि संस्थांचा मोठा भाग असायला हवा.

दशोली ग्राम स्वराज्य मंडल या उत्तरखंडातील चण्डीप्रसाद भटांच्या संस्थेने या दृष्टीने मोठे प्रचंड काम केले आहे. तसे पाहिले तर इथे मांडलेल्या अनेक कल्पना त्यांच्याच आहेत. अलकनंदानदीच्या खोऱ्या-तील २८–२९ गावातील लोकांना संघटित करून त्यांनी वृक्षारोपणाचे काम मोठ्या जोरात केलेले आहे आणि त्यांच्या रोपवनातील जिवंत राहण्याचे आणि वाढीचे प्रमाण जंगलखात्याच्या रोपवनांहून खूपच जास्त आहे; पण तथे शासनातर्फे प्रागतिक धोरण काहीच दाखवले गेलेले नाही. ते झाले आहे गुजराथेत; पण हे सर्व अनुभव एकत्र करून आपल्याला आता पुढे जावयाचे आहे

□

## हार्दिक अभिनंदन

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे उपाध्यक्ष व आदिवासी जाणीव–जागृती केंद्राचे संचालक श्री. शरद कुलकर्णी चार महिन्यांच्या अभ्यास-दौऱ्यासाठी नुकतेच अमेरिकेस रवाना झाले. 'फोर्ड फाउंडेशन' व 'अमेरिकन फील्ड सर्व्हिसेस इंटरनॅशनल' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या अभ्यास-दौऱ्यात भारतातील १५ नामवंत कायदेतज्ज्ञ सहभागी झाले आहेत. सार्वजनिक हितासाठी कायद्याचा वापर करणाऱ्या अमेरिका व कॅनडातील विविध संस्थांच्या कामाची पहाणी व अध्ययन ते करतील. श्री. शरद कुलकर्णी वॉशिंग्टन डी. सी., येथील 'नॅशनल मायग्रंट लिगल सर्व्हिसेस' या स्थानांतरित मजुरांना कायदेविषयक मदत करणाऱ्या संस्थेच्या कामाची पहाणी व अध्ययन करतील. परिषदेच्या वतीने श्री. शरद कुलकर्णी यांचे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा !

# वनसंरक्षण व संवर्धनाची व्यवस्था

वसंत पळशीकर

खाजगी मालकीच्या जमिनींवर केली जाणारी वृक्ष शेती, वेगवेगळ्या प्रकारच्या सार्वजनिक मालकीच्या जमिनींवर नियोजनपूर्वक विशिष्ट जातींच्या झाडांची जोपासलेली वने आणि प्राकृतिक वने असे तीन प्रकार गृहीत धरून वनसंरक्षण व संवर्धन याबाबत विचार केला पाहिजे.

चारा, पाने, फळे, लाकूड इत्यादींना असलेली मागणी वाढत आहे आणि त्यांना मिळणारी किंमतही चांगली आहे. त्यामुळे अन्नधान्याची शेती न करता वृक्षशेती करणे हळूहळू किफायतशीर ठरत जाईल अशी चिन्हे आजच दिसत आहेत. वृक्षशेतीच्या विस्तारामधून निर्माण होणारे प्रश्न दोन प्रकारचे असतील. अन्न-धान्याच्या एकूण उत्पादनावर वाढत्या वृक्षशेतीचा परिणाम विपरीत होण्याची शक्यता आहे. वृक्षशेतीमुळे शेतीवर मजुरीच्या कामासाठी अवलंबून असणाऱ्यांना रोजगार आणखी कमी प्रमाणात उपलब्ध होईल ही शक्यता नाकारता येत नाही. संघटित मजुरशक्तीला तोंड द्यावे लागू नये म्हणून चांगल्या जमिनींवरही जमिनमालक किफायतशीर वृक्षशेती करू लागतील तर नवल नाही.

## स्थानिक गरजांना महत्त्व

ग्रामपंचायतींनी आपल्या ताब्यात असलेल्या पड जमिनींवर व गावातील आसपासच्या जमिनींवर नियोजनपूर्वक जंगलांची जोपासना करावी. अशा जंगलापासून जमिनींवर गुरांसाठी चारा, खतासाठी पालापाचोळा, जळण, इमारती बांधकाम, औजारे, इत्यादींसाठी लाकूड, फळे, बिया, मुळे इत्यादी प्रकारची उपज या स्वरूपात मुख्यतः स्थानिक गरजा भागविण्यासाठी उत्पादन काढावे ही कल्पना केवळ इष्ट नाही तर आवश्यक आहे.

गावाच्या आसपास नसलेली, सरकारी दप्तरामध्ये जंगल म्हणून नोंदलेली जी जमीन आहे. त्यापैकी बऱ्याच मोठ्या क्षेत्रात गेल्या शंभर दीडशे वर्षांमध्ये मानवी हस्तक्षेप झालेला आहे. सरकारच्या वनखात्याच्या अखत्यारीत असलेल्या या जंगलक्षेत्रापैकी प्राकृतिक सजीव समुदायांच्या स्वरूपात (नॅचरल बायॉलॉजिकल कम्यूनिटीज) राखून ठेवायची क्षेत्रे सोडता इतर भागांमध्ये हळूहळू सघन पद्धतीने मानवनिर्मित वनांची निर्मिती व त्यांचे दोहन या गोष्टी वाढलेली लोकसंख्या आणि या लोकांच्या अनेक अंगांनी वाढलेल्या घरगुती व औद्योगिक गरजा लक्षात घेता अटळ दिसतात.

मानवनिर्मित वने आणि प्राकृतिक अरण्ये यांच्या संदर्भात मुख्य जबाबदारी राज्य व केंद्र पातळीवरील शासनाची राहील, व्यवस्थापनही एक ना एक प्रकारे वनखात्याच्या हाती राहील ही गोष्ट उघड दिसते.

या दोन प्रकारच्या वनांच्या संदर्भात या जंगलांमध्ये प्राचीन काळापासून रहात असलेल्या आदिवासी जमातींचा प्रश्न उपस्थित होतो.

हा प्रश्न साधा, सरळ मात्र राहिलेला नाही. अगदी अंतर्भागातील, अत्यल्प लोकसंख्या असलेल्या, बाहेरच्या औद्योगिक, राजकीय व सांस्कृतिक प्रवाहांपासून वेगळ्या राहीलेल्या आदिवासी जमाती आज अगदी अपवादभूत आहेत. इतर प्रमुख व मोठ्या आदिवासी जमाती यांची पुढारलेल्या जगाशी बऱ्याच अंशी सामावणूक झालेली आहे.

शे-दीडशे वर्षांपूर्वी जंगलांवर आदिवासी लोकांची उपजीविका फार मोठ्या प्रमाणात अवलंबून होती. इतकेच नाही तर त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीमध्ये वहिवाटीने प्रस्थापित झालेले त्यांचे सर्व पारंपरिक हक्क मान्य करता येतील का व करावेत का असा प्रश्न उपस्थित होतो.

नवीन वननीती व वनखात्याची पुनर्रचना व खात्याचे कार्य यासंबंधी विचार करीत असताना या तीन प्रकारच्या वनांचा विचार स्वतंत्रपणे केला पाहिजे.
□

खाजगी मालकीच्या जमिनींवरील वृक्षशेती व वने यांच्या बाबतीत वनखात्याचे नियंत्रण असण्याचे स्थूल मानाने कारण नाही. तज्ज्ञ सल्ला व सहाय्य देणारी प्रशिक्षण करणारी, वृक्षशेतीला, वनांच्या लागवडीला प्रोत्साहन देणारी यंत्रणा उभारण्याची या संदर्भात गरज आहे. व्यापारी तत्त्वांवर वनखात्याने अशी 'कन्सल्टन्सी एजन्सी' चालविण्याचे आव्हान स्वीकारण्यासारखे आहे. मागणी पुरवठा या बाजारपेठेतील न्यायानुसार खाजगी मालकांना आपल्या इच्छेनुसार लागवड करण्यास मोकळीक असावी.

निकृष्ट कसाच्या शेतजमिनी, पडजमिनी जेथे लहान व गरीब शेतकऱ्यांच्या मालकीच्या आहेत तेथे वृक्षशेतीस प्रोत्साहन द्यायचे तर भांडवलाचा पुरवठा करावा लागेल आणि लागवड व उत्पन्नाची सुरुवात या काळात पहिल्या पाच वर्षांपर्यंत खावटीची काही व्यवस्था करावी लागेल. यासाठी कोणती व्यवस्था सगळ्यात योग्य व परिणामकारक ठरेल ?

## राजकारणाचे अनिष्ट परिणाम

स्थानिक पातळीवर गरजू लोक, सेवाभावी संघटना आणि पतपुरवठा करणाऱ्या बँका किंवा वित्तीय मंडळे यांची सांगड घातली जाण्याची गरज दिसते. प्रत्येक गोष्टीचा व्यक्तिगत स्वार्थ, सत्ताकांक्षा व पक्षीय राजकारण यांच्यासाठी उपयोग करून घेण्याची बुद्धी न ठेवता शासनाने दूरदर्शीपणा बाळगला तर योग्य मर्यादित व्यापारी तत्त्वांचा आग्रह राखून अशी सांगड सहकारी संस्थांच्या चौकटीचा वापर करून घालता यावी. अवाजवी प्रमाणात लोभी स्वार्थ, सत्ताकांक्षा व गटबाजीचे राजकारण घुसल्याकारणाने सहकारी चळवळीचे अनेक अनिष्ट परिणाम घडलेले आहेत हे खरे; पण सहकारी चळवळीच्या माध्यमातून लोकांचे विधायक कर्तृत्व लक्षणीय प्रमाणात प्रकट झाले आहे ही गोष्ट विसरणे आत्मघातकी ठरेल.

अन्नधान्य व इतर आवश्यक शेतमालाच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होऊन सर्वसामान्य लोकांची



हलाखी वाढू नये या दृष्टीने वृक्षशेतीच्या संदर्भात कोणती सामाजिक नियंत्रणे प्रस्थापित करायला हवीत व नियंत्रणे राबवणारी यंत्रणा काय असावी याचा विचार आवश्यक आहे. जमीन तंत्रविद्या आणि मनुष्यबळ यांच्या उत्पादक वापराचे व्यापक संकेत, त्या संदर्भातील स्थलकाल विशिष्टपथ्ये, आणि व्यापक नियंत्रण व नियोजन अत्यावश्यक असूनही आज त्या दिशेने समाजाची वैचारिक तयारी अभावानेच आहे. तरी पण नवसमाजनिर्मितीच्या कामामध्ये गुंतलेल्या सेवाभावी संघटना जर या कार्यात सहभागी झाल्या व सहकारी सामुदायिक तत्त्वांवर जर हे कार्य संघटित होऊ शकले तर सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय संतुलन राखून काम होईल अशी आशा बाळगण्यास पुष्कळ जागा आहे.

## वित्तपुरवठा

शासनाची मुख्य भूमिका योग्य अटींवर वित्तपुरवठा करण्याची राहावी. वनखात्यामधील जे अधिकारी/तज्ज्ञ व्यापारी तत्त्वांवर कन्सल्टन्सी एजन्सी वा रोपवाटिका (नर्सरी) चालविण्यास तयार असतील त्यांना अशा संस्था उभ्या करण्यास प्रोत्साहन व अर्थसहाय्य द्यावे.

ग्रामपंचायत–पातळीवर सार्वजनिक मालकीच्या जमिनींवर चारा, लाकूडफाटा इ. दृष्टींनी वनसंवर्धनाचे कार्य पार पाडण्यामध्ये शासनाचा व वनखात्याचा सहभाग पुष्कळ अधिक राहील ही गोष्ट स्पष्ट आहे. आजचे एकंदर मानस व वस्तुस्थिती लक्षात घेता पुढील धोके लक्षात घेऊन योजनेची आखणी करावी लागेल. सामान्यतः ग्रामपंचायती गावातील प्रतिष्ठितांच्या प्रभुत्वाखाली असतात. त्यांच्यात विशेष अभिक्रम व कार्यक्षमता आढळत नाही. पैशाचा वापर करताना काटकासर, चोख हिशेब व सचोटी याबाबत आग्रह नसतो आणि सरकारी कर्जे परत फेडण्याच्या बाबतीत बेपर्वाई वृत्ती असते ही वस्तुस्थिती म्हणून स्वीकारूनच पुढचा विचार करायला हवा.

गावाच्या अखत्यारीतल्या जमिनीवर जंगलाची जोपासना करण्याच्या प्रकल्पाशी वनखाते, बँका व सेवाभावी संघटना, ट्रस्ट यांची सांगड घालायला हवी. संस्थात्मक रचना कशी असावी व पैशाची उभारणी कशी करावी हे ठरविण्यासाठी पुरेसा अनुभव सामाजिक पातळीवर आपल्यापाशी आहे. वनसंवर्धनासाठी ग्रामपंचायतीने विशेष कर बसवावा आणि वसुलीच्या प्रमाणात शासनाने अनुदान, बँकांनी कर्जे द्यावीत असे धोरण ठेवता येईल. असा विशेष कर स्वेच्छापूर्वक बसविण्यास व वसूल करण्यास तयार असणाऱ्या ग्रामपंचायतीमध्येच आरंभाला ही योजना राबवावी. रोजगार हमी योजनेची वनसंवर्धन–प्रकल्पाशी सांगड घालणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत–पातळीवर वनसंवर्धन व व्यवस्थापन कार्यासाठी वनखात्यामध्ये विशेष विभाग उघडावा वा वेगळी यंत्रणा उभारावी.

आरक्षित मानवनिर्मित वने तसेच त्या दिशेने क्रमशः ज्यांचा विकास करावयाचा आहे अशी अर्धवट अवस्थेतील प्राकृतिक वने आणि जी प्राकृतिक वने म्हणूनच राखावयाची आहेत अशी वने यांची व्यवस्था प्रामुख्याने शासनाच्या हाती राहील; पण एकाच वनखात्याच्या हाती या दोन्ही प्रकारच्या वनांची व्यवस्था राहू नये. पहिल्या प्रकारची वने ही आज नाही तरी उद्या व्यापारी उपयोगाच्या दृष्टीने वाढविलेली वने ठरणार आहेत. त्यांची वेगळ्या तत्त्वांवर सोय लावावी लागेल हे उघड आहे.

## स्थानिक आदिवासींचा अधिकार

स्थानिक आदिवासी लोकांचे जंगल हे अनेक अंगांनी आवासक्षेत्र (habitate) आहे व त्यांचा जंगलावर काही विशेष अधिकार पोचतो या दोन गोष्टी स्पष्टपणे मान्य करूनच पुढचा विचार करावयास पाहिजे हे निर्विवाद आहे. जंगलाशी या प्रकारचे नाते नसणाऱ्या ग्रामीण वा नागरी लोकांप्रमाणेच आदिवासींचा विचार केला जाऊ शकत नाही.

आजच्या वनविषयक कायद्यांमध्ये ही गोष्ट स्वीकारलेली नाही असे नाही; पण व्यवहार फार वेगळा होत आला आहे. याचे मुख्य कारण प्रशासन बिगर आदिवासींच्या हाती आजवर राहिले व आदिवासींकडे पशुवत, 'रानटी' माणसे या नजरेनेच त्यांनी तुच्छ भावाने पाहिले हे आहे. जित–जेते असाच हा संबंध साररूपाने व प्रकर्षाने राहिला आहे. ही पूर्वग्रहदूषित दृष्टी नव्या वनविधेयकातही प्रकट व्हावी यात नवल नाही.

त्याच वेळी मध्यंतरीच्या काळात आदिवासी समाजामध्ये झालेल्या स्थित्यंतराचीही दखल घेण्याची जरुरी आहे. बिगरआदिवासी तसेच आधुनिक आर्थिक

विकासवादी विचार व दृष्टी यांचा संस्कार झालेला, आदिवासी जीवनप्रणालीशी फटकून राहणारा एक वर्गच आज उदयाला आला आहे. यात सर्वस्वी आदिवासींमधील धनिकांचा भरणा आहे असे नाही. आर्थिक व सामाजिकदृष्टया सर्व थरांमधील आदिवासींचा यांच्यात समावेश होतो. जंगलाशी त्यांचे नाते आज बदलले आहे. वनरक्षण, संवर्धन व व्यवस्थापन यामध्ये आदिवासींचा सहभाग असावा हे निश्चित करताना या वस्तुस्थितीचे विस्मरण होऊनही चालणार नाही.

सामान्य आदिवासी, सरकारी कर्मचारी, ठेकेदार या सर्वांना एका मापाने मोजण्याची चूक करता कामा नये; पण एका बाबतीत त्यांच्यात असलेले साम्य लक्षात घ्यावे लागेल. पोट भरण्याचा अन्य पर्यायी मार्ग उपलब्ध आज नसल्याने का होईना आदिवासीही जंगलाचे अवाजवी दोहन करण्यात वा ते नष्ट करण्यात गुंतलेला आहे. दूरदृष्टया आपले हित कशात आहे याची जाणीव त्याला नाही. जाणीव करून घेणे परवडणार नाही असेही पुढे जाऊन म्हणता येईल; पण जाणीव नाही ही गोष्ट खरीच.

या पार्श्वभूमीवर वनरक्षण व संवर्धनकार्याची व्यवस्था काय असावी, आदिवासींचे कोणते हक्क कोणत्या मर्यादेपर्यंत स्वीकृत व्हावेत व आदिवासींचा सहभाग व्यवस्थापनात कशा प्रकारे असावा यासाठी पुढील मार्गदर्शक तत्त्वांचा अंगीकार करणे योग्य होईल.

(१) त्या त्या वनविभागामध्ये जे केवळ जंगलांच्या जवळ राहतात ते आणि ज्यांचे जंगल हे विविधांगांनी आवासक्षेत्र ( Habitual ) आहे असे स्थानिक लोकसंख्येचे दोन भाग करावेत. जंगल हे ज्यांचे आवासक्षेत्र आहे अशांना त्यांच्या जंगलातील सर्व प्रकारच्या कौटुंबिक उपयोगासाठी माल वाजवी प्रमाणात विनामूल्य घेता यावा.

(२) जंगल हे आवासक्षेत्र आहे हे लक्षात घेऊन, व्यापारी तत्त्वांवर मानवनिर्मित वने विकसित करीत असताही लोकांच्या विशेष उपयोगाची झाडे राखावीत, तसेच काही भाग लोकांसाठी प्राकृतिक अवस्थेत सोडून द्यावेत.

(३) रक्षण, संवर्धन व विविध प्रकारचे दोहन (जंगलातून लाकूडफाटा काढणे, बिया, फळे, डिंक, मध, पाने इ. माल गोळा करणे इ.) यासाठी असलेल्या व्यवस्थेत अग्रहक्काने त्या वनविभागातील लोकांना रोजगार दिला जावा.

(४) शासकीय खात्यामार्फतच जी कामे केली पाहिजेत त्यांचा अपवाद सोडता इतर कामांसाठी एक ना एक प्रकारच्या सहकारी वा गाव वा लोकसंघटनांचा माध्यम म्हणून वापर करावा; पण खाजगी ठेकेदारांना प्रवेश बंद असावा.

(५) वनविभागांसाठी महसूल, पोलीस, न्याय व इतरही खात्यांची पुनर्रचना विशेष व स्वायत्त सेवांच्या धर्तीची करावी.

(६) वनरक्षण व संवर्धन, आदिवासींच्या हक्कांचे रक्षण व त्यांच्या हिताचे संवर्धन यामध्येच ज्यांचा सरळ सरळ हितसंबंध असेल अशी वेगळी खाती (पर्यावरण खाते, आदिवासी हक्क संरक्षण खाते) वा स्वायत्तमंडळे आणि सेवाभावी संघटना यांचा सहभाग असावा. या दृष्टीचे प्रत्येक वनविभागासाठी एक नियंत्रक मंडळ असावे. त्यावर अशी स्वायत्त खाती' सेवाभावी संघटना, संबंधित समाज व निसर्गशास्त्रज्ञ व सार्वजनिक जीवनातील चारित्र्यसंपन्न व्यक्ती यांना पुरेसे प्रतिनिधित्व असावे. या मंडळास व त्यावरील सभासदांना पर्यवेक्षणाचे ( इन्स्पेक्शन ) मूल्यांकनाचे (इव्हॅल्युएशन) करण्याचे तसेच तक्रारी नोंदवून घेऊन चौकशी करण्याचे अधिकार असावेत.

जी वने प्राकृतिक अवस्थेत राखावयाची असतील वा अशा निर्मितीसाठी क्षेत्रे नव्याने सोडून द्यावयाची असतील त्या सर्वांची व्यवस्था आजच्या वनखात्याकडे नसावी. वनखात्यामधील काही वेचक अधिकारी व कर्मचारी घेऊन एक वेगळे खाते निर्माण करावे (पर्यावरण खाते) व या खात्याला एक एक बिगर सरकारी तज्ज्ञ व आस्थेवाईक सामान्य जन यांच्या सल्लागार नियंत्रण मंडळाची जोड द्यावी.

अशा प्राकृतिक वनांमध्ये वा त्यासाठी निवडलेल्या क्षेत्रांमध्ये आधीपासून वस्ती करून राहणाऱ्या आदिवासी जमातींना, त्या क्षेत्रातच राहण्याबाबतीत निवड करण्याची संधी द्यावी. वनाची प्राकृतिकता कायम राखण्याच्या दृष्टीने त्यांच्यावर येणाऱ्या बंधनांमुळे इतरत्र स्थलांतर करणे ते पसंत करतील अशी शक्यता जास्त वाटते. दुसरीकडे, अगदी तुरळक मनुष्यवस्ती आहे असे वा पूर्ण निर्जन असे भाग निवडण्याचे पथ्य सामान्यतः सांभाळावे. प्राकृतिक वनांसाठी राखून ठेवावयाच्या क्षेत्रांबाबत प्रकटन प्रसिद्ध करून लोकांच्या सूचना, हरकती ऐकून त्यावर विचार केला जावा असाही नियम करणे उचित होईल. एकदा अशी क्षेत्रे निर्धारित केल्यावर आर्थिक-औद्योगिक विकास, पर्यटन, आधुनिकता अशा कोणत्याही सबबीवर त्या क्षेत्रामध्ये मानवी वावर व हस्तक्षेप प्रमाणाबाहेर होणार नाही याची दक्षता कठोरपणे घ्यावी लागेल.

# आदिवासींच्या सामाजिक चळवळी

ऋषि मसराम



सामाजिक विकासाकरिता स्वातंत्र्य, समता व बंधुतेची अत्यावश्यकता असते. या तीन तत्त्वांचा अवलंब करणारा समाज आदर्श समाज होय. ज्या समाजात ही तिन्ही तत्त्वे अव्हेरून उलट तत्वांची म्हणजे गुलामी विषमता आणि भाऊबंदकी ही विरोधी तत्त्वे कार्यान्वित होतात त्या वेळी या विरोधी तत्त्वांचा मुकाबला करण्याकरिता समाज सुधार चळवळी उदयास येतात. ही समाजविघातक तत्त्वे उद्‌भवण्याची कारणे विषम समाजरचना, वर्णाश्रमपद्धती जातिभेद, आणि समाजव्यवस्थेची उतरंडी ही आहेत. सामाजिक उतरंडीमध्ये मूठभर लोक शीर्षस्थानी असून समाजाचा फार मोठा वर्ग जो शूद्रवर्णात गणला गेला तो तळाला असतो. त्याचे तोंड उतरंडीमुळे बंद असते. त्याला वरचे मार्ग बंद असतात. तो तसाच दबलेला राहतो. त्यामुळेच त्याला दलितवर्ग असे समजले जाते.

## इतरांच्या चळवळी

या अन्यायकारक समाजरचनेविरुद्ध मुकाबला करण्यास भारतात दलितांच्या उद्धाराच्या, आत्मसन्मानाच्या चळवळी उभारण्यात आल्या. उत्तर भारतात आदिधर्मी जाटवा, कुरिला, आदिहिन्दूज व नमोशूद्राज या चळवळी, मध्यभारतात सतनामी व रामनामी चळवळी, दक्षिणेतील तामिळनाडूत आदिआन्ध्रा, आदिद्रविडा, केरळात पोलयाज, थियाज, एजवाज आणि दक्षिण–पश्चिम भारतात आदिकर्नाटक ह्या चळवळी उदयास आल्यात. राजा राममोहन रॉय यांची ब्रह्मोसमाज व महर्षि दयानंदाची आर्यसमाज ही चळवळसुद्धा उपयोगी ठरली; परंतु शास्त्रशुद्ध पायावर मानवी हक्क संरक्षणाची व आत्मसन्मानाची आद्य चळवळ म्हणून महात्मा ज्योतिबा फुल्यांची सत्यशोधक चळवळ ही विशेष प्रसिद्धीस आली पेरियार रामस्वामी नायकर यांची दलितांच्या अस्मिता-संवर्धनाची दक्षिण भारतातील चळवळ चालू असतानाच भारतात बाबासाहेब आंबेडकरांच्या दलितांच्या मुक्तीची चळवळ १९२७ ते ५६ या काळात विशेष उपकारक ठरली. सन १९२७ चा महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह व नासिकचा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह या देशातील दलितांना विशेष प्रेरक ठरल्यामुळेच त्यांची स्मृती म्हणून भिमा कोरेगावचा क्रांतिस्तंभ आजही अभिमानाने उभा आहे. राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज आणि वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांनीसुद्धा समाजप्रबोधनाच्या चळवळी राबविल्या हे विसरता येत नाही कर्मवीर भाऊराव शिंदे-महर्षी धोंडो कर्वे, राजर्षि शाहूमहाराज यांनीसुद्धा असल्या चळवळी उभारून मोलाचे कार्य केले आहे.

आदिवासींमध्ये सर्व्हंन्टस ऑफ इंडिया सोसायटी, रामकृष्ण मिशन, कस्तुरबा मेमोरियल ट्रस्ट, गांधी स्मारक निधी, सर्वोदय मंडळ आणि आदिम जातिसेवक संघानेसुद्धा समाजसुधाराच्या चळवळी राबविल्या; परंतु त्या विशेष लोकप्रिय ठरू शकल्या नाहीत.

असल्या प्रकारे या देशात अनेक व्यक्ती आणि संस्थांनी समाजसुधार चळवळी राबविल्यात आदिवासींनीसुद्धा अशा चळवळी उभारल्या की नाही यांची जाणीव बऱ्याच

लोकांना नसल्यामुळे त्यांच्या चळवळींचा तपशील सादर करणे आवश्यक वाटते.

## आदिवासींच्या महाराष्ट्राबाहेरच्या चळवळी

१) **बिहारमधील चळवळी** – आदिवासींचा हिन्दु समाजाशी जसजसा संबंध वाढत गेला तसतसे परस्पर संघर्ष वाढू लागले आणि आदिवासी जीवनात ढवळा-ढवळ करण्याचे प्रयत्न झाले. हिन्दूंचा आदिवासींवरील प्रभाव दूर करण्याकरिता १७८२ मध्ये राजमहल टेकडयांच्या प्रदेशात आदिवासींना जागृत करण्याची चळवळ उभारली गेली. इंग्रजांकडून आपल्या सुरक्षेची हमी मिळण्यास ही आत्मसन्मानाची चळवळ उभारण्यात आली होती. ही चळवळ शमविण्याकरता बिहारात 'वन्य जमातींचा प्रदेश' असा आदिवासींकरिता प्रथमच वेगळा कायदा बनविण्यात आला.

सन १८३२ साली संथाल लोकांची चळवळ 'भूमिज चळवळ' या नावाने उदयास आली. या चळवळीचे नेते गंगा नारायण संथाळ होते. नंतर कांदू आणि सिद्ध संथाळ यांनी १८५० मध्ये जमीनदार व व्यापारी यांच्याविरुद्ध चळवळ उभारून शोषणास आव्हान दिले.

१८९७ मध्ये बिरसा भगवान या मुंडा आदिवासीने ही आदिवासींच्या शोषणमुक्तीची चळवळ पुढे रेटली.

१९१४ मध्ये उरावे लोकांनी नाना भगतच्या नेतृत्वाखाली आदिवासींना ब्रिटिशांकडून समतापूर्वक न्याय मिळावा म्हणून अहिंसक चळवळ उभारली. ही सविनय चळवळ होय.

संथाळी धर्मगुरूने 'छोटा नागपूर' उन्नती मंडळ स्थापून प्रशासनात केवळ आदिवासीच माणसे असावीत तरच आदिवासींना न्याय मिळेल या अपेक्षेने त्यांनी झारखंड प्रदेशाच्या स्वायत्त राज्याच्या मागणीची चळवळ उभारली. अलीकडे माजी खासदार जयपालसिंग या चळवळीचे नेते होते.

२) **ओरिसामधील चळवळी** – इंग्रजांच्या शोषणातून मुक्ती मिळावी म्हणून सन १८१९ साली कोहान प्रदेशात आदिवासींनी उग्र सामाजिक चळवळ उभारली. या चळवळीचे स्वरूप हिंसक असल्याने अनर्थ टाळून आपला विश्वास बसवावा या उद्देशाने इंग्रजांनी 'सामान्य कायद्याच्या कक्षेतून वगळलेल्या प्रदेशाचे खास नियम' तयार करून प्रथमच आदिवासींना कायदेशीर संरक्षण देण्यात आले.

याच राज्यात सन १९५० साली खोंड लोकांची चळवळ, 'मलकागिरीची कोया चळवळ' १८७९ मध्ये तर सापरा आदिवासींची चळवळ सन १८९० मध्ये उभारली गेली होती.

३) **राजस्थानमधील चळवळ** – भारतात इंग्रजांना शह देण्याची पहिली चळवळ आदिवासींनीच केली. आदिवासींच्या जमिनी रजपुतांनी बळकाविल्यामुळे भिल्ल लोकांनी सन १८१२ मध्ये ही आत्मसन्मानाची चळवळ उभारली. ही चळवळ गुजरात व राजस्थानच्या सीमाभागात झाली. राजस्थानमधील गोविंदगिरी या भिल्लाने ही चळवळ उभारली होती.

४) **आन्ध्रातील आदिवासींची चळवळ** – गोदावरी जिल्ह्यातील पहाडी रेड्डी या आदिवासी जमातींनी जमिनीचे मालकी हक्काचे पट्टे मिळविण्याकरता सन १८७९ मध्ये ही चळवळ उभारली होती. पुढे सन १९४० साली गोंड लोकांनी किसान चळवळ उभारली. या चळवळीचे नेते भिमा कुमरा गोंड होते. याच राज्यात कोया लोकांची चळवळ उभारली गेली. तिचे प्रणेते आलुरी सीताराम राज होते. आदिवासीच्या शोषण, मुक्तीच्या या चळवळीसारख्याच अन्य चळवळी म्हणजे केरळात कुरुचिया लोकांची चळवळ व आसामात राणी गाईड लो हिची चळवळ ह्या होत.

दि. २० एप्रिल १९८१ रोजी इंदरवल्ली तालुका उटनूर जि. आदिलाबाद येथे आदिवासींनी आपल्या लुबाडलेल्या जमिनी परत मिळाव्या म्हणून 'गिरिजन रायतु कुलिसंगम' या संस्थेतर्फे कुंडाफल्ली सितारामैया यांचे अध्यक्षतेखाली असहकार चळवळ उभारली होती. या चळवळीत १३ आदिवासी मारले गेल्याचा सरकारी आकडा असला तरी स्थानिक लोकांकडून मिळालेल्या माहितीनुसार ६० आदिवासींना प्राणास मुकावे लागले असे समजते. खासदार लक्ष्मी कांतम्मा या चळवळीशी संबंधित असल्याचे कळते.

५) **मध्यप्रदेशातील चळवळ** – बस्तर जिल्ह्यातील आदिवासी लोकांनी आपल्या स्वायत्त राज्याच्या मागणीकरिता सन १९१० साली गोंड लोकांनी चळवळ उभारली होती; परंतु ती विशेष कार्यान्वित झाली नाही. पुढे ५० वर्षांनंतर राजे प्रवीणचंद्र भंजेदेव यांनी या चळवळीला पुनरुज्जीवित केले; परंतु सन १९६१ च्या पोलिसी गोळीबारात ते ठार झाल्याने ही चळवळ थंड पडली.

सन १९७० साली दंडकारण्य योजनेतील अधिकाऱ्यांनी बस्तर विभागातील आदिवासी कुमारिकांना मोलकरणी म्हणून ठेवून त्यांचे विनयभंग केले. अशा सुमारे ३०० कुमारिका माता बनल्या. ही बाब आदिवासींना न पटल्याने त्यांनी सामाजिक अस्मितेची चळवळ उभारली. परिस्थिती आटोक्याबाहेर जाऊ नये म्हणून बस्तरच्या कलेक्टरांनी हस्तक्षेप करून अशा सर्व अधिकाऱ्यांना या मुलींना पत्नी म्हणून दर्जा देण्याचे मध्यवर्ती सरकारचे आदेश दिल्यामुळे व या सर्व अधिकाऱ्यांनी आदेशाचे पालन करण्याचे आश्वासन दिल्यामुळे ही चळवळ मागे घेण्यात आली.

६) ईशान्य भारतातील चळवळी – इंग्रजांविरुद्ध असंतोष व्यक्त करण्याकरिता सन १८३२ मध्ये नेफामध्ये अंगामी नागांनी आणि सन १८७१ मध्ये लोथा नागांनी, १८७४ मध्ये रेंगमा नागांनी आणि सन १९३० मध्ये सेमा नागांनी चळवळी उभारल्या होत्या. इंग्रजांनी आपल्या प्रदेशात प्रवेश करू नये, आपले स्वायत्तराज्य कायम असावे याकरिता ह्या चळवळी होत्या. प्रसिद्ध नागानेता फिझो यांच्या नागालँड मागणीची चळवळ प्रसिद्ध आहे.

सन १९५० मध्ये मिझोरामच्या मिझो आदिवासींनी आपल्या स्वतंत्र राज्याची मागणी करण्याची चळवळ उभारून आपल्याकरिता भारतीय संविधानात वेगळी तरतूद करून घेतली. ही चळवळ भूमिगत स्वरूपात आजही अस्तित्वात असल्याचे नाकारता येत नाही. या चळवळीचे सांप्रतचे सूत्रधार लालडेंगा मानले जातात.

## महाराष्ट्रातील आदिवासींच्या सामाजिक चळवळी

१) भारतातील पहिली सामाजिक चळवळ म्हणून जिचा उल्लेख केला जातो ती सन १८१७ मध्ये धुळे विभागात भिल्लआदिवासींनी उभारली होती. भिल्ल, कातकरी आणि महादेव कोळ्यांच्या या सन १८७० पर्यंत नेटाने चालविलेल्या चळवळीमुळेच महाराष्ट्रात न १८७४ साली अनुसूचित जिल्ह्याचा वेगळा कायदा करण्यात आला.

२) इंग्रजांविरुद्ध समर्थपणे तोंड देण्यास सन १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात बऱ्याच आदिवासी पुढाऱ्यांनी नेतृत्व करून हौतात्म्य पत्करले; परंतु त्यांचा कुठेही उल्लेख नाही. चंद्रपूर जिल्ह्यातील मोलमपल्लीचा जमीनदार बाबुराव पुलेश्वर बापू पेंदीर राजगोंडा आणि नागपूर गोंड घराण्यातील सरदार शंकरशहा आणि रघुनाथशहा यांनी इंग्रजांविरुद्ध उठाव केल्यामुळे सन १८५८ साली त्यांना प्राणास मुकावे लागले. याच काळात तंट्या भिल्ल, विष्णू गोंड आणि कंगला माझी (पहिला) यांनी या चळवळीत सक्रिय योगदान दिले होते.

३) मेजर ल्युसी स्मिथ यांचेकडे आदिवासींच्या संरक्षणाचे नियम बनविण्याचे काम सोपविले होते. आदिवासींच्या साहित्य-संस्कृतीचे संकलन करून स्मिथना देण्याचे कार्य चंद्रपूरच्या गोंड राजाचे मंत्री याच वणी शहराचे निळकंठराव ठुमे यांचेकडे सोपविले होते. सन १८६५ ते ९३ मध्ये त्यांनी आदिवासींच्या जीवनदर्शनाची वखर स्मिथना दिली होती. याच सुमारास पुणे जिल्ह्यातील होणाजी केंगले यांनी सावकारशाहीविरुद्ध चळवळ उभारून आदिवासींच्या शोषणमुक्तीचा विडा उचलला परंतु सन १८७६ साली त्याला फासावर चढविण्यात आले.

४) सन १८८९ च्या दुष्काळात आदिवासींची बरीच उपासमार झाली, या परिस्थितीचा फायदा घेऊन जमीनदारांनी आदिवासींच्या जमिनी बळकावल्या. याविरुद्ध रामा किरवा या महादेव कोळ्यांनी उग्र चळवळ उभारली होती. सावकारी विरुद्ध उठाव म्हणून सरकारी खजिने लुटण्याची चळवळ पुणे विभागात बाळाजी पीचड यांनी उभारली होती.

५) वेठबिगारी, शोषण व अमर्याद काम या विरुद्ध महादेव कोळ्यांच्या सहाय्याने ठवळा भांगरे यांनी तीव्र स्वरूपाची चळवळ उभारली होती. यात ठाकर कातकरी व पावरा लोकांनी सक्रिय भाग घेतला होता.

या सर्व असंतोषाचे निरीक्षण करून इंग्रजांनी या जमातींना संरक्षण देण्याकरिता सन १९१९ साली पहिला इंडिया ॲक्ट तयार केला; पण त्याचा विशेष लाभ झाला नाही.

६) शैक्षणिक विकासाशिवाय आदिवासींना प्रगती करता येणार नाही हे लक्षात घेऊन सन १९२३ साली नागपूर येथे कै. पंचमबाबु आत्याम, बालाराम मडावी, तुकाराम मडावी आणि पतिराम वट्टी यांनी शिक्षणसंस्था स्थापन करून गोंडसभा पाठशाळा सुरू केली पुढे यवतमाळचे गुंडारामजी मसराम यांनी आदिवासी शिक्षण प्रसारक मंडळ, आचार्य भंसाळी यांनी वनवासी

सेवा मंडळ आणि चंद्रपूरचे श्री. ल. म. मडावी यांनी शिक्षणक्षेत्रात आदिवासींना प्रवेश मिळविण्यास बरेच प्रयत्न केलेत.

७) सायमन कमिशन आणि गोलमेज परिषदेदुढे श्री. नारायण मास्तर मडावी, रामजी मास्तर गेडाम आणि आडकू वानोसा पेंदारे मास्तर यांनी या दोन्ही परिषदांचे प्रशासकीय अधिकारी सर एच जे हट्टन यांचेकडे निवेदन दिले. त्यामुळे सन १९३५ च्या दुसऱ्या इंडिया अॅक्टमध्ये आदिवासींना जादा संरक्षण दिले. परंतु हे जादा संरक्षण फसवे वाटल्यामुळे वरील तिन्ही व्यक्तींनी सत्याग्रहाचे आव्हान केल्यामुळे सरकारने सन १९३८ साली ओ. एच. बी. स्ट्रॅट यांचेकडे आदिवासी प्रश्न सोपविले; परंतु त्यांनी कोणत्याच भरीव सूचना न केल्याने आदिवासींनी बंडाचे आव्हान केले. परिस्थिती विशेष चिघळू नये म्हणून सरकारने मुंबई विभागासाठी सर वाय. डी. सेमिंग्टन व नागपूर विभागासाठी सर सी. यु. विलस यांचेकडे आदिवासींचे प्रश्न सोपवून शेती सुधार मालकी हक्क याविषयी संरक्षण देण्याचे ठरविले.

८)सन १९४२ साली पांढरकवडयाचे समाजसुधारक श्री. राघोबा विठोबा देवगडे मडावी यांनी ताडउमरी येथे समाज सुधार समिती स्थापून तारु मास्तर कुरसेंगे यांच्या मदतीने शाळा व वसतिगृह चालू केले. ह्याच वेळी त्यांनी 'भिडीकर गोंड समाज सेवा समिती' स्थापून सामूहिक विवाह वगैरे सामाजिक कार्यक्रम चालू केले. कमी खर्चाचा सुधारणावादी असा पहिला विवाह मांडवीचे जैराम बाबुराव सुरपाम यांचा श्री. राजाराम देवगडे मडावी इंजिनियर यांची कन्या कुमारी ममताबाई हिचेशी झाला.

९) ठाणे आणि नासिक जिल्ह्यात वारली लोकांनी मानवी हक्काच्या प्राप्तीकरिता मुक्तिआंदोलन सन १९४५–४६ मध्ये उभारले होते. या चळवळीला कॉमरेड गोदावरीताई परुळेकर यांचे सहकार्य लाभले होते. या चळवळीमुळे आदिवासींना नवजीवन लाभले हे विसरता येत नाही.

१०) भारत स्वतंत्र झाल्यानंतर घटनासमितिद्वारा भारताची घटना बनविण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे सोपविण्यात आले. त्यावेळी आदिवासींच्या संरक्षणाकरिता तरतूदी केल्या जाव्यात अशी मागणी संपूर्ण देशातून आल्यामुळे अमृतलाल विठ्ठलभाई ठक्कर ऊर्फ ठक्करबाप्पा यांच्या खास उपसमितीकडे हे कार्य सोपवून या समितीने केलेल्या सर्व सूचना बिनविरोध मान्य केल्यामुळे आदिवासींना घटनात्मक सवलती मिळू लागल्या.

११) दि. २ ऑगस्ट १९३१ रोजी आदिवासी जमातीपैकी विदर्भात सर्वप्रथम प्रधान जमातींनी चंद्रपूर येथे राजे अकबरशहा यांचे अध्यक्षतेखाली आणि राजे यादवशहा बापू यांचे प्रमुख उपस्थितीत सार्वजनिक स्वरूपाचे जाहीर अधिवेशन बोलावून आदिवासींना कायदेशीर विकासाचे संरक्षण मिळावे अशी मागणी केली होती व त्यांनीच सर हट्टन यांचेकडे मागण्यांचे निवेदन दिल्यामुळे सन १९३५ च्या इंडिया अॅक्टमध्ये आदिवासींना जादा सवलती प्राप्त झाल्या होत्या. आदिवासींमधील आंतरजातिभेद नष्ट व्हावा याकरिता त्यांनी प्रयत्न करून सर्वप्रथम आदिवासी समाजाची अस्मिता जागृत करण्याचे महानकार्य या प्रधान समाजनेच केले हे विसरता येत नाही.

१२) दि. ४ जून १९५२ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील चितेगाव येथे श्री. मुंगसू अर्जुनाजी गेडाम, लखुबुवा उईके, जैराम मेश्राम, नलेश्वर आणि लवंगूजी पिसाजी मडावींनी अनेक परिस्थितीना तोंड देऊन हा समाज एकसंध करण्याचा प्रयत्न केला. ही चळवळ चंद्रपूर जिल्ह्यात विशेष लोकप्रिय झाली. या कामात गडचिरोलीचे श्री. लहुजी मडावी गुरुजींनी भरीव सहकार्य केले हे विसरता येत नाही.

१३) विदर्भातील रॉबिनहुड समजले जाणारे शामादादा कोलाम यांनी यवतमाळ जिल्ह्यात समाजवादी चळवळ आदिवासींमध्ये लोकप्रिय करण्याचा प्रयत्न केला. पूंजीपतींकडून जास्तीची संपत्ती प्राप्त करून ती गरिब आदिवासींमध्ये वाटण्याचा पुरोगामी कार्यक्रम त्यांनी आखला परंतु शेवटी त्याच्याकडे एक दरोडेखोर याच भूमिकेतून बघण्यात आले.

१४) स्वातंत्र्यकाळात आदिवासींच्या सवलतीचा प्रश्न उभा झाला. घटनेत अनुसूचित व गैर अनुसूचित असे क्षेत्र आखण्यात आले. अनुसूचित क्षेत्राबाहेरील आदिवासींना सवलती मिळत नव्हत्या त्याकरिता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. सा. कन्नमवार यांनी क्रमांक सीएमएस–इ्री–११८३२७९ दि. १० मे १९६३ साली केन्द्र सरकारला जोरदार पत्र लिहिले; परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. त्याकरिता विदर्भातील

आदिवासी-नेते श्री. बाबुरावजी मडावी, विठ्ठलराव मेश्राम आणि नारायणसिंह उईके यांनी बरेच प्रयत्न करून आदिवासींमध्ये सामाजिक संघटनेची जाणीव निर्माण केली. या निरंतर प्रयत्नामुळे शेवटी २७ जुलै १९७७ साली हा प्रश्न कायमचा सुटला. या कामी १९६० साली ठेबर आयोगानेसुद्धा योग्य सूचना केली होती.

१५) भारतातील सर्व आदिवासींना सवलती लागू झाल्यानंतर या सवलतींवर गैरआदिवासींनी जातीची खोटी प्रमाणपत्रे मिळवून सवलतीचे अपहरण करणे चालू केले. याविरुद्धसुद्धा आदिवासींनी आवाज उठविला.

आदिवासी समाजाच्या सेवा व सुधार चळवळीचे सूत्रधार मानलेल्या कै. बाबासाहेब वरळीकर आणि जयन्त नटावदकर यांचे तालमीत तयार झालेली मंडळी सर्वश्री महादेवभाई गोपाल कडू, अे. टी. पवार, र. पा. वळवी, दादासाहेब सौदाने आणि बाबुरावजी मडावी यांनी राजकारणाबरोबरच सामाजिक सुधार चळवळीत नवे प्राण ओतावयास भरीव सहकार्य केले. त्यामुळेच आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात थोडाफार सुधार झाला आहे; परंतु गैरआदिवासींची केवळ कोरडी सहानुभूती असल्याने अपेक्षित पल्ला गाठता आला नाही. विकासाची गती, आदिवासींच्या न्याय्य मागण्या, व्यापक सामाजिक निती आणि आपली वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती यात परस्पर संतुलन साधूनच वैचारिक गतिमानतेच्या भरवशावर आदिवासी समाज आपली आदर्श व प्रेरणादायी शक्ती उभी करून सुधारणेचा टप्पा गाठू शकतो.

शेवटी आदिवासींच्या प्रत्येक समाज सुधार चळवळीकडे बंड आणि क्रांतीच्या दृष्टिकोनातून न पाहता त्यांच्या रास्त मागण्यांकडे सहानुभूतीने पाहिल्यास विकासाचे मार्ग सापडतील अशी सूचना थोर मानववंशशास्त्रज्ञ डॉ. बेरियर एल्विन यांनी भारत सरकारला केल्यामुळे आदिवासींच्या मागण्यांना विद्रोह किंवा क्रान्तीचे रूप न देता आत्मसन्मानाची चळवळ म्हणून संबोधण्याचा पायंडा पडून आदिवासींच्या अशा निरंतर चळवळींतूनच आजचे अल्पसे सुधारित चित्र आपणास दिसत आहे. त्यामुळे भारतीय सामाजिक चळवळींमधील आदिवासींच्या चळवळीचा हा फार मोठा विजय आहे हे मान्य करावे लागेल. तरीपण आदिवासींनी अपेक्षित यश गाठले नाही हीच या चळवळीची शोकांतिका म्हणावी लागेल. अठरा पगड जमातींच्या समूहात कुणी कुणाला नेता मानावे हा प्रश्न निर्माण होऊन भिन्न पोटजातीय नेत्यांचे नेतृत्व झिडकारल्यामुळेच आज आदिवासींना वैफल्य भोगावे लागत आहे.


---

# आदिमानव

भाकरीसाठी
तापीकाठची प्रेरणा घेऊन
उठणारा
सातपुड्याचा वनवासी.
घेऊन हाती मशाल
हिंडेल
क्रांतीच्या शोधात.
निर्भयतेची बांधून
खूणगांठ
करीन भांडवलशाहीशी
दोन हात.
द्वंद्व युद्ध
छेडिले गेले तर ?
कागदाचे कप्पे निघतील
होरपळून
राखेसमान !
माणून म्हणून ओळखा
नाही तर आदिमानव करिल सर्वांना.

—लक्ष्मण कदम
(भारतीय कष्टकरी संघटना, शहादे)

# ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचे लढे



दत्ता ताम्हणे

ठाणे जिल्ह्यात आदिवासींची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या एकतृतीयांश आहे. डहाणू, जव्हार, मोखाडा, पालघर, वाडा व शहापूर या तालुक्यात ही वस्ती प्रामुख्याने आहे. या वनवासी समाजाच्या आर्थिक परिस्थितीकडे १८७५ पासूनच शासनाचे लक्ष वेधले आहे. यांच्या खास संरक्षणाखाली वेळोवेळी राज्यघटनेमध्ये तरतुदी करण्यात आल्या आहेत. १९३५ च्या प्रांतिक स्वायत्ततेच्या कायद्यातही आदिवासींचे प्रदेश प्रांतिक सरकारांच्या अंमलाखालून काढून ते गव्हर्नरांच्या आधिपत्याखाली ठेवण्यात आले होते. तथापि आदिवासींचे आर्थिकमान सुधारावे व त्यांचे अव्याहत चाललेले शोषण कमी व्हावे यासाठी ठोसपणे प्रयत्न सुरू झाले असतील तर ते १९३७ च्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर प्रांतिक मंत्रिमंडळे स्थापन झाल्यावरच.

## सिमिंग्टन रिपोर्ट

१९३८ मध्ये मुंबई सरकारचे एक सनदी नोकर मि. सिमिंग्टन यांनी या प्रांतातील आदिवासींची परिस्थिती निवेदन करणारा व ती सुधारण्यासाठी काही उपाय सुचविणारा एक अहवाल सरकारला सादर केला. ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या दृष्टीने या अहवालात काही महत्त्वाच्या सूचना करण्यात आल्या होत्या. या सूचनांचा थोडक्यात गोषवारा पुढे देत आहे. या सूचनांवरूनच आदिवासींच्या प्रश्नांची स्थूल मानाने कल्पना येईल. हे प्रश्न हीच आदिवासींच्या लढ्याची पार्श्वभूमी होय.

आदिवासी कसत असलेल्या जमिनींबाबत या अहवालात म्हटले आहे की, यापुढे सरकारी पडीक जमीन मागासवर्गीयांनाच लागवडीसाठी देण्यात यावी. खंडाने घेतलेल्या जमिनीचा रास्त खंड ठरवून द्यावा व शक्यतो तो रोख पैशाने देण्याची तरतूद असावी. खंडकरी शेतकऱ्यांना कायद्याने संरक्षण देऊन त्यांना कूळहक्काची शाश्वती मिळावी व सरकारी जमिनीही त्याला एकसाली वहिवाटीने न देता कायम स्वरूपात दिल्या जाव्या.

आदिवासींचा कर्जबाजारीपणा व सावकारांकडून त्यांचे होणारे शोषण विचारात घेऊन या अहवालात असे सुचविण्यात आले आहे की, खाजगी सावकारीवर कडक नियंत्रणे घालण्यात यावी. सर्वत्र खावटी-कोठारे उघडण्यात यावी व एखादा कायदा करून आदिवासींच्या जुन्या कर्जाची माफी करण्यात यावी.

याव्यतिरिक्त आणखीही काही मूलगामी शिफारशी सिमिंग्टन अहवालात करण्यात आल्या होत्या. जंगलात काम करणाऱ्या मजुरांसाठी किमान मजुरी ठरविण्यात आदिवासी विभागात संपूर्ण दारूबंदी करण्यात यावी. प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्कूल बोर्डाकडून काढून घेऊन सरकारने स्वत:कडे घ्यावी सर्वत्र वसतिगृहे उघडून, प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे. आदिवासींच्या विकासासाठी स्वतंत्र अधिकारी, कोर्टातील खटल्यात त्यांना मोफत कायदेशीर सल्ला देण्याची यंत्रणा, त्यांच्या आरोग्यसेवेसाठी खास फिरते दवाखाने इत्यादी अनेक सूचना सिमिंग्टन अहवालात आहेत.

सिमिंग्टन अहवालामुळे शासनापेक्षाही लोकांचे, समाजसेवकांचे व राजकीय पक्षांचे लक्ष आदिवासींच्या प्रश्नाकडे गेले. खरे म्हणजे मुंबई राज्याचे त्या वेळचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनीच सिमिंग्टन यांची नियुक्ती या अहवालासाठी केली होती. खेर यांना आदिवासींबद्दल अपार सहानुभूती होती; परंतु अहवाल

हाती पडला व त्या वेळच्या राजकीय परिस्थितीत मंत्रिमंडळास राजीनामा देऊन तुरुंगाची वाट धरावी लागली हा सर्व इतिहास येथे सांगण्याची आवश्यकता नाही.

## भितरा आदिवासी ?

दारिद्र्याने ग्रासलेला, सदैव उपासमारीला तोंड देणारा, शोषणाच्या चरकात अहर्निश पिळला जाणारा आदिवासी जेवढा धीट होता तेवढाच भितराही होता. गवताने शाकारलेल्या कुडाच्या झोपडीत किंवा पानांच्या ‘भुंगळी’त तो वाऱ्या पावसाला घाबरत नव्हता. विजेच्या कडकडाटाने त्याचे अंग थरारत नव्हते. मधूनमधून जंगलात पेटणाऱ्या वणव्यांमधून तो निर्धास्तपणे बाहेर पडत होता. मांत्रिक, भगत व आदिवासी दैवतावर विसंबून तो मरणाला सामोरा जात होता आणि जंगलात एखादा वाघ अंगावर आला तर हातातील विळ्या कोयत्याने तो त्याच्याशी यशस्वी मुकाबला करीत होता. तो भीत होता फक्त पांढरपेशा माणसाला. स्वतःला सुसंस्कृत म्हणविणाऱ्या शहरी माणसांना !

एकोणीसशे अडतीसमधील एक घटना मला आठवते. मी स्वतःही घटना पाहिलेली आहे. ना. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासींची एक मोठी परिषद बोर्डी-घोलवडच्या परिसरात आयोजित केली होती. आदिवासींना तांदळाची कण्हेरी देण्याची व्यवस्था केली होती. किमान पाच हजार आदिवासी परिषदेसाठी जमा झाले होते. या विराट मेळाव्याचे फोटो घेण्यासाठी मुद्दाम छायाचित्रकार आले होते. एका छायाचित्रकाराने जनसमुदायावर आपला कॅमेरा रोखला आणि कुणी तरी कुजबुजले की, ती तोफ आहे. निमिषार्धात सारी सभा सैरावैरा धावू लागली, हरणाच्या गतीने आजूबाजूच्या डोंगर-पठाराकडे धावणारे ते आदिवासी पाहून मौजही वाटत होती व खंतही वाटत होती. पाच मिनिटांनंतर त्या परिषदेच्या ठिकाणी आम्ही काही कार्यकर्ते व पाचपंचवीस शहरी मंडळी याखेरीज कोणीही शिल्लक नव्हते. असा हा निसर्गाशी झुंज घेणारा पण माणसाला घाबरणारा आदिवासी एखाद्या संघर्षासाठी तयार करणे ही मोठीच अवघड गोष्ट होती.

## सरकारी अधिकाऱ्याची प्रेरणा

ठाणे जिल्ह्यातील वारली लोकांचा पहिला लढा १९४४ मध्ये झाला. त्या वेळी दुसरे महायुद्ध सुरू होते. युद्धकार्यासाठी माणसे, पैसा, साधनसामुग्री इत्यादी मिळविण्यासाठी सरकार धनिकांना पाठीशी घालीत होते. महागाई वाढत होती व आदिवासींना गवतकापणीची दिवसाची मजुरी चार आणे मिळत होती. या पिळवणुकीविरुद्ध संप करण्याची चिथावणी त्या वेळी आदिवासींसाठी नेमलेले खास अधिकारी खंडेराव सावे यांनी दिली. उंबरगाव तालुक्यातील एक हजाराहून अधिक आदिवासी संपात सामील झाले. सावे यांनी संपाची प्रेरणा दिली; पण ते नेतृत्व देऊ शकले नाहीत. सरकारी अधिकारी म्हणून त्यांच्या काही मर्यादा असणे स्वाभाविक होते. संप इतर तालुक्यात पसरू नये यासाठी सावकार व सरकार यांनी चांगलेच दहशतीचे वातावरण निर्माण केले व मजुरी वाढवीत असल्याचे जाहीर केले. चार आण्यांवरून मजुरी पाच आण्यांवर गेली. संप बारगळला; पण असे संघर्ष करण्याचे बीज याच वेळी पेरले गेले. एका नव्या जाणिवेचा जन्म आदिवासींमध्ये सूक्ष्म रूपाने झाला.

कम्युनिस्टांची ध्येयनिष्ठा, काम करण्याची चिकाटी अनुकूल संधीचा पुरेपूर फायदा घेण्याची हातोटी, यातूनच त्यांचा ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागात प्रवेश झाला. बेचाळीसच्या स्वातंत्र्यलढ्यात विरोधी भूमिका घेतल्यामुळे शहरी भागात काम करणे कम्युनिस्टांना अशक्य झाले होते. याच कारणामुळे कामगार क्षेत्रातूनही त्यांची उचलबांगडी झाली होती. अशा स्थितीत त्यांनी आपले प्रमुख कार्यकर्ते ग्रामीण भागात व विशेषतः आदिवासी भागात पेरले. तशात त्यांच्या तेलंगणमधील लढ्याला भरपूर प्रसिद्धी मिळाली व त्याचाही उपयोग त्यांना आदिवासी भागात करता आला. ठाणे जिल्ह्यापुरतेच बोलावयाचे तर उंबरगावच्या संपाची पार्श्वभूमीही त्यांना सोयीची वाटली व उंबरगावमधील एका बड्या जमीनदाराचा मुलगा कम्युनिस्ट पार्टीचा कार्यकर्ता म्हणून काम करू लागल्याने त्यांना त्या भागात पाय रोवायला आणखी सुलभ झाले.

## आदिवासींची संघटना

हे सर्व जरी खरे असले तरी संघर्षासाठी वारल्यांना तयार करण्याकरिता गोदावरीबाई परुळेकरांनी कठोर परिश्रम केले. त्यांच्या घराघरात त्या वावरल्या,

राहिल्या. त्यांच्यासारखेच कदान्नावर दिवस काढले व वारल्यांचा अमर्याद विश्वास त्यांनी संपादन केला. त्यांच्यामधील अस्मिता त्यांनी जागी केली. त्या काळात शामराव परुळेकर व गोदावरीबाई यांची सावकार-विरोधी भाषणे एवढी जहाल असत की त्यांच्या सभेला गेलेला आदिवासी सावकाराच्या सूडाची भाषा वापरीतच घरी येई. उघडउघड हिंसाचाराला चिथावणी देणारीही भाषणे त्या वेळी सरकारचे कम्युनिस्टांविषयी धोरण आपुलकीचे होते म्हणूनच चालू दिली गेली. त्यावेळी प्रांतात लोकनियुक्त सरकारची सत्ता असून राज्यपालाकडे शासनाचे सर्वाधिकार होते. ( त्या वेळी त्यास ब्याण्णव कलमी राजवट म्हणत. ) अशा प्रकारे कम्युनिस्टांना अनुकूल असलेल्या परिस्थितीचा त्यांनी पुरेपूर वापर केला व आदिवासींची एक प्रचंड व जिवंत संघटना उभी केली. तरुण वारल्यांची शिबिरे होऊ लागली. या शिबिरांतून आलेल्या तरुणांना, लाल बावट्याचे शिपाई ' म्हणून संबोधले जाई. सावकारांना दमदाटी करून काही ठिकाणी त्यांच्या गवताच्या साठ्यांना आगी लावून, कित्येक प्रसंगी सावकारांच्या बैलगाड्या मोडून-तोडून, बैलांच्या शेपट्या कापून दहशतीचे वातावरण तयार करण्यात आले. याच दहशतीमधून सावकारांकडून खंडणीही वसूल करण्यात आली.

ही पूर्वतयारी झाल्यावर दि. ११ ऑक्टोबर १९४५ रोजी तळवाडा येथे वारल्यांना कुऱ्हाडी-कोयते घेऊन येण्याचा आदेश देण्यात आला. संघटनेची तयारी किती आहे याची ती चाचपणी होती. या सशस्त्र जमावाने एका सावकाराच्या घराकडे मोर्चा वळवला. पोलिसांनी जमाव हटवण्याचा प्रयत्न केला; पण जमाव किंचितही मागे सरेना. अखेरीस गोळीबार करण्यात आला. या पहिल्या गोळीबारात तीन आदिवासी जागच्या जागी ठार झाले. जखमींचा निश्चित आकडा समजू शकला नाही. कारण अनेक जखमींना खांद्यावर घेऊन आदिवासी जंगलात पळून गेले !

कॅमेऱ्याला तोफ समजून पळून जाणारा वारली आता प्रत्यक्ष गोळीबार पहात असताही जागेवरून हलला नाही. तळवाड्याच्या गोळीबारानंतर वारल्यांची चळवळ फोफावतच गेली १९४६ च्या ऑक्टोबर महिन्यात जंगल मजुरीचे दर वाढवून मिळविण्यासाठी आंदोलन सुरू करण्यात आले. याच वेळी पालघर तालुक्यात नानिवली येथे वारल्यांचा हिंसक जमाव पांगविण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला व त्यात पाच आदिवासी ठार झाले.

### रचनात्मक कार्य

अशा प्रकारे हे वारल्यांचे बंड पसरत असतानाच देशातील राजकीय चित्र बदलले व पुन्हा लोकनियुक्त मंत्रिमंडळे सत्तेवर आली. त्या वेळी मुंबई राज्याचे गृहमंत्री ना. मोरारजी देसाई होते. त्यांनी बहुतेक सर्व कार्यकर्त्यांना एक तर हद्दपार तरी केले किंवा अटकेत ठेवले. त्यानंतर त्या भागात शांतता प्रस्थापित व्हावी व वारल्यांच्या हिंसक आंदोलनाला विधायक वळण लागावे यासाठी आचार्य भिसे यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेसचे व काँग्रेसअंतर्गत समाजवादी पक्षाचे अनेक कार्यकर्ते महिनेच्या महिने या भागात तळ देऊन राहिले. सुप्रसिद्ध गांधीवादी कार्यकर्ते वसंतराव नारगोळकर व सौ. कुसुमताई नारगोळकर यांनी डहाणू तालुक्यात कैंबाड येथे एक रचनात्मक कामाचे केन्द्र सुरू केले तर समाजवादी पक्षाच्या सौ. यमुताई साने, केशव मदन इत्यादी कार्यकर्ते बधने येथे जाऊन राहिले व प्रामुख्याने आदिवासींमध्ये तक्रारनिवारणाचे कार्य करू लागले.

बंड संपले, शांतता झाली. आदिवासी सेवा मंडळाने सरकारी मदतीने अनेक विधायक कामे सुरू केली. आदिवासींना सवलती देण्यासाठी सरकारी यंत्रणेची चाकेही द्रुतगतीने फिरू लागली. कम्युनिस्टांच्या लढ्यातून दोन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. एक म्हणजे वारली जागा झाला. आपणही माणूस आहोत व माणसासारखे जगण्याचा आपणास हक्क आहे याची जाणीव त्यांना झाली व दुसरे म्हणजे सामाजिक व राजकीय कार्यकर्ते यांचे लक्ष या भागाकडे गेले. वृत्तपत्रांचे वार्ताहर या भागांना मधूनमधून भेटी देऊन येथील दारिद्र्याचे व शोषणाचे वृत्त देऊ लागले आणि शासनाच्या मदतीचा एक अप्रतिहत ओघ या भागाकडे वळला.

आज या भागातील वारली पुष्कळच सुजाण झाले आहेत. शासनाकडून मिळणाऱ्या सवलती पदरात कशा पाडून घ्याव्यात याचे इंगित त्यांना समजले आहे. म्हणून सत्ताधाऱ्यांच्या भोवती तो रेंगाळताना दिसला तरी अजूनही आतून त्याचा ओढा लालबावट्याकडे आहे. गोदावरीबाईंची सभा असली तर आजही दहा–वीस मैल पायी रान तुडवण्याची त्याची तयारी असते.

इतिहासाने ज्याची दखल घ्यावी असा हा एकच महत्त्वाचा लढा ठाणे जिल्ह्याच्या संदर्भात म्हणता येईल.

## पर्नाळीचा इनामदारविरोधी लढा

पर्नाळीच्या शेतकऱ्यांचा लढा हा ठाणे जिल्ह्यातील अत्यंत चिकाटीने, निर्धाराने व संपूर्ण शांततामय मार्गाने दिर्घकाळ चालविलेला एकमेव लढा म्हणावा लागेल. या लढ्यात केवळ आदिवासीच होते असे नाही. सुमारे सत्तर टक्के आदिवासी व उरलेल्यांमध्ये बंजारी व अन्य समाजाचे शेतकरी होते. समाजवादी पक्षाने पूर्णपणे आपल्याच ताकदीवर लढविलेला हा लढा होता.

ह्या लढ्याची पार्श्वभूमी अशी--पालघर--तारापूर रस्त्यावर पालघरपासून सुमारे पंधरा किलोमीटर अंतरावर पर्नाळी हा एक सुमारे दोनशे उंबरठा असलेला इनाम गाव. गावाच्या हद्दीत चारशे एकर भातजमीन व एक हजार एकर गवती जमीन. गावाच्या बाजूने बाणगंगानदी वाहते. या नदीवर एक बंधारा बांधून व नदीकाठी चांगली धर्मशाळा बांधून प्रवाशांची उत्तम सोय केल्याबद्दल १८६६ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने एका पारशी गृहस्थास हा गाव इनाम दिला. पुढे १९२७ मध्ये या पारशी गृहस्थाच्या वारसांनी आपले सर्व हक्क मनोर येथील रईस या सधन मुस्लिम कुटुंबास विकत दिले व आता रईस कुटुंबीय हे या गावचे इनामदार झाले. लागवडीस आणलेल्या भातशेतीवर संपूर्ण मालकी हक्क हे कसणाऱ्या शेतकऱ्याचे आहेत व इनामदार हा फक्त गवती जमिनीचा मालक आहे. अशी भूमिका समाजवद्यांनी घेतली. आपला हा दावा सिद्ध करण्याएवढे कागदोपत्री पुरावे आपणाकडे असले तरी वहिवाटीतून निर्माण होणारे हक्क विचारात घेता व दिवाणी दाव्यांना लागणारा खर्च व त्यापेक्षा वर्षानुवर्षे चालणारे खटल्याचे कामकाज पहाता कोर्टाकडून दाद मिळू शकणार नाही व यासाठीच इनामदाराबरोबर बोलणी करून अथवा संघर्षाच्या मार्गातूनच हा प्रश्न सुटू शकेल असा विचार करून समाजवाद्यांनी इनामदाराशी बोलणी करण्याचा प्रयत्न केला; परंतु काहीच प्रतिसाद न मिळाल्याने खंडबंदिच्या लढ्याचे रणशिंग फुंकले. १९४९ ते १९५२ असा तीन वर्षे हा लढा चालू होता.

या तंट्याची ठळक वैशिष्टये म्हणजे खंडवसुलीसाठी येणारा शेकडो सशस्त्र पोलिसांचा ताफा व आदिवासी स्त्रियांकडून केला जाणारा शांततामय प्रतिकार. पोलीस येताच गावातील सर्व पुरुषमंडळी जंगलाकडे निघून जात. घरात कोणी पुरुष नसल्याने पोलिसांना घरांत शिरू देण्यास स्त्रिया प्रतिबंध करीत. सुरुवातीला एक-दोन वेळा पोलीस आले तसे परत गेले; पण त्यानंतर मात्र त्यांनी घरांत शिरून असेल ते भात जप्त करण्याचे ठरविले. स्त्रिया दरवाजामधून ठाण मांडून बसल्या. त्यांच्यावर काही प्रसंगी लाठीहल्ला करण्यात आला. हातातील बांगड्या फोडण्यात आल्या. पोलीस घरात घुसून सर्व धान्य घेऊन गेले; पण शेतकऱ्यांकडून एकही हिंसात्मक प्रकार कधीच घडला नाही.

पर्नाळीमध्ये शेतकऱ्यांच्या नियमीत सभा होत. तेव्हा काही काळानंतर पर्नाळी हद्दीत सभांवर बंदी घालण्यात आली. फरक एवढाच झाला की, आता पर्नाळीऐवजी बावडा, बाणगाव, कोटिंब इत्यादी नजिकच्या गावांतून या सभा भरू लागल्या. त्यानंतर लढ्याचे नेतृत्व करणारे दत्ता ताम्हणे, मारुतीकुमार मदन इत्यादींवर पालघर तालुक्यात प्रवेश करण्यास मनाई करणारे हुकूम बजावण्यात आले. हिरा, अर्जुन, भास्कर इत्यादी स्थानिक कार्यकर्त्यांना पालघर तालुक्यातून हद्दपार करण्यात आले. पुढे या सर्व कार्यकर्त्यांनी सरकारी प्रतिबंधक हुकूम मोडून तुरुंगवास पत्करला. खटल्याचे सर्व कामकाज ठाण्याचे एम. एस. प्रधान वकिलांनी चालविले.

पर्नाळीहून सुमारे शंभर स्त्री--पुरुष शेतकऱ्यांनी मुंबईच्या सचिवालयापर्यंत पायी काढलेला ८० मैल लांबीचा मोर्चा हे या लढ्याचे आणखी एक वैशिष्टय. महाराष्ट्र किसान पंचायतीचे प्रमुख श्री. किशाभाऊ पेंडसे यांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. त्यांनीही हा ऐंशी मैलांचा प्रवास पायीच केला. दररोज सकाळी दहा मैल प्रवास, दुपारी मुक्कामाचे ठिकाणी जाहीर सभा, सायंकाळी पुन्हा दहा मैल आगेकूच, रात्रीच्या मुक्कामाच्या गावी आणखी एक सभा, मधल्या वेळात मोर्चातील शेतकऱ्यांसाठी बौद्धिक वर्ग असा या मोर्चाचा पद्धतशीर कार्यक्रम आखण्यात आला होता.

या लढ्याचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, रामानंद तिवारी इ. नेत्यांनी पर्नाळीस भेट देऊन कार्यकर्त्यांना केलेले मार्गदर्शन.

अखेरीस शेतकऱ्यांची चिकाटी व समाजवादी नेतृत्व यांचा विजय होऊन इनामदाराने वाटाघाटी सुरू केल्या. गावची सर्व गवती जमीन शेतकऱ्यांनी विकत घ्यावी व

भातजमीन त्यांच्या नावे करण्यात यावी अशी तडजोड उभयपक्षी मान्य झाली. भूविकास बँकेने कर्जाची व्यवस्था केली व पर्नाळीतील शेतकऱ्यांची सहकारी संस्था स्थापन करून सर्व गवती जमीन व बाणगंगेवरील धर्मशाळा संपूर्ण मालकी हक्काने सोसायटीकडे हस्तांतरित झाली. आजही ही सोसायटी कार्यक्षमतेने काम करीत आहे.

## भूमिमुक्ति आंदोलन

भारतात कम्युनिस्टांनी सुरू केलेल्या, 'जमीन बळकाव' आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर समाजवाद्यांनी सुरू केलेले 'भूमिमुक्ती' आंदोलन हे अधिक चिरस्थायी व परिणामकारक ठरले. शक्तीचा वापर करून बळकावलेल्या जमिनी प्रतिपक्षाने पुन्हा अधिक शक्तीचा वापर करून परत मिळविल्या. भूमिमुक्ती आंदोलनामागील सत्याग्रही तंत्रामुळे यातून निर्माण झालेल्या शक्ती रचनात्मक कार्याकडेही वळविता आल्या.

ठाणे जिल्ह्यात हे आंदोलन प्रामुख्याने पालघर व जव्हार या आदिवासी भागात झाले. जंगलामधील ज्या लागवडीयोग्य जमिनीवर एक प्रकारचे अतिक्रमण करून आदिवासींनी धान्याची लागवड केली अशा जमिनीवरून त्यांना बेदखल करण्यात आले होते. या जमिनी पुन्हा ताब्यात घेणे हा या कार्यक्रमाचा महत्त्वाचा भाग होता. पालघर तालुक्यातील एका ट्रस्टकडे असलेली सुमारे चौदाशे एकर जमीन भूमिहीनांसाठी मिळावी अशीही एक मागणी करण्यात आली. ठिकठिकाणी सत्याग्रहाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. सुमारे ८०० ते १००० आदिवासींनी या आंदोलनात प्रत्यक्ष सत्याग्रह करून कारावास भोगला. स्त्रियाही या सत्याग्रहात सामील होत्या. त्यांचे नेतृत्व यमूताई साठे, निर्मला पेंडसे इत्यादि समाजवादी महिलांनी केले. जव्हारमध्ये देवजीभाई चौधरी, रवींद्र वैद्य, उद्धव कुलकर्णी इत्यादि कार्यकर्त्यांनी हे आंदोलन नेटाने चालविले.

## भूमिसेनेचा जन्म

भूमिमुक्ती आंदोलनातूनच ठाणे जिल्ह्यात भूमिसेनेचा जन्म झाला. मनोर भागातील एक तरुण व धडाडीचे आदिवासी कार्यकर्ते काळूराम धोदडे हे या आंदोलनात ठाण्याच्या तुरुंगात होते. त्यांचे अनेक सहकारीही तेथेच होते. सरकारी पडीक जमीन ताब्यात घेण्याऐवजी कुळकायद्याखाली आपणास मिळालेल्या ज्या जमिनी आपल्या अज्ञानाचा फायदा घेऊन लबाडीने सावकाराने कबजात घेतल्या आहेत, त्या जमिनी सावकारी पैशातून मुक्त करणे हे यापुढे भूमिमुक्तीचे स्वरूप ठेवावे, हा कार्यक्रम जेथे जेथे असा अन्याय होईल तेथे तेथे आयोजित करावा असा विचार या तरुण मंडळींनी केला. या आदिवासींच्या संपूर्ण शोषणमुक्तीच्या लढ्यासाठी भूमिसेना स्थापन केली. आज या सेनेचे काम प्रामुख्याने पालघर तालुक्यात असले तरी वाडा, जव्हार व डहाणू येथील आदिवासीही या नव्या संघटनेकडे आकृष्ट झाले आहेत. घरगड्यांचा प्रश्न, सालदारांचा प्रश्न, हस्तांतरित जमिनीचा प्रश्न, इत्यादि प्रश्न हाती घेऊन या संघटनेने अनेक छोटे छोटे व स्थानिक स्वरूपाचे लढे संघटित केले व त्यात यशही मिळविले आहे.

ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचे लढे म्हणून ज्यांना म्हणता येईल अशा काही घटनांची हकीकत वर दिली आहे. आदिवासी भागात एवढे जुलूम, अन्याय, शोषण इत्यादि प्रकार आहेत की, कुणीही समाजसेवक अथवा राजकीय कार्यकर्ता तेथे गेला तर त्याला या प्रश्नाकडे पहावेच लागते यातूनच कुठे ना कुठे सतत संघर्ष चालू असतो.

बेदखलीच्या प्रश्नावर श्री. वसंतराव नारगोळकर यांनी पंधरा दिवसांचे केलेले उपोषण, तलवाडे भागात कुळकायद्याचा अयोग्य वापर करून आदिवासींच्या जमिनी पुन्हा ताब्यात घेतल्याबद्दल आ. ग. प्र. प्रधान यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेला सत्याग्रह. रोजगार हमी योजनेसाठी रवींद्र वैद्य यांच्या नेतृत्वाखाली होणारे मोर्चे, धरणे, उपोषण आदि लढे व तलासरी भागात कम्युनिस्टांतर्फे चालणारी लहानमोठी आंदोलने यांचा जर नीट अभ्यास केला तर या भागातील जीवन सतत संघर्षमयच आहे हे समजून येईल.

अजूनपर्यंतच्या या लढाऊ परंपरेत आता इंदिरा काँग्रेसचे कार्यकर्तेही उतरू पहात आहेत. नुकताच जंगल कामगार सोसायट्यांचा एक मोर्चा त्यांनी आयोजित केला होता.

एके काळचा भितरा आदिवासी आज सावकार, सरकार व अन्य शोषण करणारे यांचे विरुद्ध संघर्षाची भूमिका घेऊन उभा आहे. त्यांच्या या सर्व बाजूंनी होणाऱ्या पिळवणुकीकडे शासनाचे लक्ष वेधलेले आहे. यातूनच त्यांचे उद्याचे जीवन अधिक सुकर व शोषणमुक्त होईल अशी चिन्हे दिसत आहेत.

# ‘नोसिल फिल्म टेक्निक’

शिवाजीराव जामदार

नोसिल फिल्म तंत्राचा वापर ही चोपण, चिबड, क्षारयुक्त जमिनीमध्ये खते व औषधे वापरून उत्पन्न काढण्याची नवी आधुनिक पद्धती आहे.

यामध्ये प्लॅस्टिक आवरणातून पाणी व आवश्यक जीवनसत्त्वाचा पुरवठा पिकांना केला जातो. त्यामुळे पाणी व अन्न कमी प्रमाणात वापरल्याने वाया जात नाही.

पाणलोटक्षेत्रात पाण्याचा निचरा न झाल्यामुळे पुष्कळ जमिनी क्षारयुक्त व चिबड झाल्या आहेत. अशा जमीनी कोणत्याच पिकास योग्य नसतात. त्याचप्रमाणे अति मुरमाड व निकृष्ट जमिनीचेदेखील प्रमाण आपल्याकडे खूपच आहे. त्यात अवर्षण व पाण्याचा कमी साठा यावर रामबाण उपाय म्हणून मफतलाल उद्योगसमूहातील नॅशनल ऑरगॅनिक केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड (नोसिल) कंपनीने हे तंत्र विकसित केले आहे.

या योजनेत एक मध्यवर्ती पाण्याची मोठी टाकी व त्यापासून असंख्य पाण्याचे छोटे मार्ग असतात.

**नोसिल फिल्म तंत्रासाठी करावयाच्या गोष्टी :**

(१) शेताची बांधणी.
(२) मध्यवर्ती टाकीचे बांधकाम.
(३) पाण्याचे मार्ग तयार करणे.
(४) रोपांची लागण करणे.
(५) जीवनसत्त्वे पिकांना देणे.
(६) छोटया पाटातील अडथळे दूर करणे.

कृषिविकासप्रतिष्ठानच्या फार्मवर ५ गुंठे क्षेत्रात नोसिल फिल्म तंत्राचा प्रयोगादाखल प्लॉट घेण्यात आला आहे. ५ गुंठे क्षेत्राच्या मधोमध १ गुंठा जागेत ६० फूट लांब × ३ फूट रुंद × ३ फूट उंच, अशा मापाचा एक हौद बांधण्यात आला आहे. हौदाचे बांधकाम माती व दगडाचे असून त्यावर शेणाने सारवले आहे. हौदाचे आतील भाग व कठडे नोसिल पी. व्ही. सी. कापडाने झाकले आहेत व त्यात हौद भरेतो पाणी सोडले आहे. या पी. व्ही. सी. कापडामुळे टाकीतील पाणी झिरपणार नाही. हौदाची पाणी साठविण्याची क्षमता ८ हजार लिटर आहे. उरलेल्या दोन्ही बाजूंच्या दोन-दोन गुंठे क्षेत्रात १० मीटर लांबीच्या व दोन चारीमध्ये १ फूट व दीड फूट अंतर असून एका बाजूला ४४ व दुसऱ्या बाजूला ४४ फूट याप्रमाणे चाऱ्या तयार केलेल्या आहेत. छोटया चारीची रुंदी अडीच इंच व लांबी १० मीटर आहे. या छोटया चाऱ्याची पातळी समान राखलेली आहे. छोटया चारीत नोसिल कंपनीचे पी. व्ही. सी. कापड अंथरलेले असते. म्हणजेच फक्त छोटया छोटया चाऱ्या या पी. व्ही. सी. कापडाच्या पट्ट्यांनी झाकलेल्या आहेत.

प्रतिष्ठानने ऑक्टोबर १९८२ मध्ये या छोटया चाऱ्यांच्या काठावर नेपियर या गवताची रोपे लावली.

किलतानाचे अडीच इंच रुंद व ५ इंच लांब असे तुकडे करून ते छोटया चारीवर १० इंच अंतरावर दोन्ही बाजूंनी ठेवले. त्यावर थोडी माती ठेवली. गवताचे रोप या किलतानाच्या तुकड्यावर उभे करून ओलसर माती त्या रोपाच्या बुडाला लावली. किलतानाचा तुकडा केशाकर्षण तत्त्वामुळे सारखा ओला रहातो व त्यामुळे रोपाच्या मुळांना पाण्याचा एकसारखा पुरवठा होतो. रोपांच्या मुळ्या किलतानाच्यामुळे सारीतील पाण्यात उतरतात व थोडया मुळ्या सभोवतालच्या मातीत जातात व रोपे आधार घेऊन भराभर वाढू लागतात.

## पाण्याची बचत

विजेच्या मोटारद्वारे पाण्याची टाकी भरलेली असते व छोटया छोटया ओळींना १ इंच किंवा ३–४ इंची प्लॅस्टिकच्या नळीने सायफन–पद्धतीने पाणी दिले जाते. या ४ गुंठे क्षेत्रास रोज फक्त एक हजार लिटर पाणी लागते. बारीक चऱ्यांमधील पी. व्ही. सी. कापडामुळे पाणी झिरपत नाही. पाण्याची खूप बचत होते. नेहमीच्या पद्धतीपेक्षा पिकास फक्त २५ टक्के पाणी लागते. याचा अर्थ ७५ टक्के पाण्याची बचत होते.

रोपांना मायक्रो व मॅक्रो जीवनसत्त्वे थेट मुळाशी

देता येतात. त्यामुळे हीही वाया जात नाहीत. हौद ८ हजार लिटर क्षमतेचा असल्यामुळे आठवड्यातून एकदा विहिरीच्या पाण्याने भरला तरी चालतो. महत्त्वाचे म्हणजे विहिरीतील पाणी पृथःकरण करून खताची मात्रा ठरविता येते. त्यामुळे रोपांना योग्य खाद्य मिळते व त्यांची वाढ जोमाने होते. रासायनिक खते मुख्य हौदात टाकली जातात. रोपांना कीटकनाशकेदेखील पाण्यातूनच देण्यात येतात. त्यामुळे या गवतावर कसलाच रोगपडत नाही. त्यांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते व रोपे जलद वेगाने वाढतात.

या नेपियर गवताची रोपे लावल्यापासून दीड महिन्याने ते पहिल्या कापणीस येते. त्यानंतर दर २१ दिवसांनी कापणी करता येते. इतकी झपाट्याने या गवताची वाढ होते.

## शेतकऱ्यांना वरदान

या नेपियरमध्ये १५ टक्के प्रथिने असल्याने दुभत्या व इतर जनावरांच्या पोषणासाठी ते फारच उपयुक्त आहे. (घास व बाजरीच्या संकरापासून तयार केलेले गजराज म्हणजेच नेपियर.) दुग्धव्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना ही पद्धत म्हणजे वरदानच ठरेल.

या ४ गुंठे जमिनीमधून नेपियरचे या नोसिल फिल्म तंत्राने जर उत्पादन काढले तर रोज ९० ते १०० किलो हिरवा चारा मिळेल व दोन संकरित गाईंच्या चाऱ्याचा प्रश्न सुटेल. हे तंत्र वापरून आता या फार्मवर भाजीपाला म्हणजे वांगी, टोमॅटो, मिरची, दोडका या भाज्या ज्वारी, बाजरी, मका ही अन्नधान्ये व उसासारखी दीर्घ मुदतीची पण पिके घेण्याचे प्रयोग करण्याचे योजिले आहे.

नोसिल प्रयोगासाठी साधारण दोन ते अडीच वर्षांच्या कालावधीत दोन ते अडीच हजार रुपये अंदाजे खर्च येतो आणि त्यापासून हिरव्या चाऱ्याच्या रूपाने उत्पन्न मिळते.

चाऱ्याची टंचाई काही अंशी कमी व्हावी म्हणून व सर्वांना निकृष्ट चोपण क्षारयुक्त जमिनीत कमीत कमी पाण्यात व कमी खर्चात छोट्याशा जागेत 'नोसिल फिल्म टेक्निक'चे तंत्र वापरून वरीलप्रमाणे यशस्वी प्रयोग चालले आहेत. याचा सर्वांनाच उपयोग होणार आहे. वरील संदर्भात अधिक माहिती हवी असल्यास पुढील पत्त्यावर संपर्क साधावा.

**कृषि विकास प्रतिष्ठान, बारामती. ४१३ १०२.**

# वनौषधी व लोकविज्ञान कृतिसत्र

## ( कशेळे, १४–१८ फेब्रुवारी १९८३ )

कशेळे येथे यासंबंधीचे पहिले शिबीर १४–१६ मे १९८२ दरम्यान घेण्यात आले होते. या शिबीरामध्ये एका कार्यकर्त्याने आमच्या भागात भरपूर वनौषधी आहेत; परंतु त्या कशा ओळखाव्या, कशा गोळा कराव्या आणि त्याचा उपयोग कसा करावा हे लोकांना माहित नाही अशी अडचण मांडली होती. त्यावरून या गोष्टी शिकता येतील अशा आणखी एका शिबिराचे आयोजन करावे अशी कल्पना पुढे आली. पुढील गोष्टींचे अध्ययन होइल या दृष्टीने १४–१८ फेब्रुवारी १९८३ दरम्यान कशेळे (ता. कर्जत, जि रायगड) येथे अॅकॅडमी ऑफ डेव्हलमेंट सायन्सच्या परिसरात हे कृतिसत्र आयोजित करण्यात आले.

१. वनस्पती कधी व कशा प्रकारे गोळा कराव्या ?
२. या वनौषधींची रोपे कशी तयार करावी ?
३. या वनस्पतींचे वनस्पतिशास्त्रदृष्ट्या नामकरण
४. स्थानिक वैदूंकडून कोणती माहिती मिळवावी ?
५. स्थानिक वनौषधींच्या परंपरेमागील शास्त्र.
६. काही साधी घरगुती औषधे कशी तयार करावी ?
७. वनौषधींची छोटीशी बाग कशी जोपासावी ?

१५ फेब्रुवारी रोजी सकाळच्या सत्राचा विषय– वनौषधींची परंपरा व त्याचे शास्त्रीय मूलस्रोत असा होता. डॉ. काळे यांनी कर्जत भागातील वनौषधीच्या परंपरेच्या विश्लेषणावरून याचा मूलस्रोत आयुर्वेद हाच असल्याचा आपला निष्कर्ष असल्याचे सांगितले. श्री. पालेकर यांनी स्थानिक वैदू पुढील पाच प्रकारात मोडतात असे सांगितले. १. वनौषधींचे उपचार करणारे. २. भगत म्हणून ओळखले जाणारे – धार्मिक श्रद्धांचा उपयोग करून मानसिक आजारावर उपाय

करणारे. ३. मंत्रउपचार करणारे. ४. अंगात येणाऱ्या स्त्रिया — यांच्याकडे मानसिक आजारावर उपचार करण्याचे सामर्थ्य असल्याचे मानले जाते. ५. प्रसूतीचे वेळी स्त्रियांची काळजी घेणाऱ्या स्त्रिया — काही विशिष्ट दिवशी व विशिष्ट वेळी वनौषधी गोळा करण्याचे पथ्य वैद्दू पाळतात.

स्थानिक वैदूंना माहीत असलेल्या सुमारे ३०० वनौषधी आपण गोळा केल्याचे श्री. पालेकर यांनी सांगितले. या वैदूंना आयुर्वेद उपचार पद्धतींची बरीच माहिती असल्याचे त्यांना आढळले. भगत व भगतीण मनोरुग्णांना मानसिक आधार देतात असा आपला निष्कर्ष असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर—लोकाभिमुख आरोग्यव्यवस्थेचे तत्त्वज्ञान — याबर चर्चा झाली. वनौषधींची माहिती करून घ्यावयाची असेल त्याने जंगलवासी व धनगरांबरोबर भटकावे असा सल्ला सुश्रुताने दिला असल्याचे श्री. दर्शनशंकर यांनी सांगितले. आयुर्वेदशास्त्र्यांनी वनौषधींचे प्राथमिक ज्ञान लोकांपासून मिळविले असले पाहिजे, वनौषधींची परिणामकारकता आढळून आल्यानंतर त्यांनी आयुर्वेदातील तत्त्वे बसविली असतील. त्यानंतर हे ज्ञान केन्द्रीभूत झाले. स्थानिक प्रवाहापासून मुख्य प्रवाहाकडे असा हा ओघ आहे. हा ओघ मुख्य प्रवाहापासून स्थानिक प्रवाहाकडेही वळणे आवश्यक होते; परंतु हे झाले नाही. परिणामत. स्थानिक प्रवाह रोडावला. आपल्या सभोवताली इतक्या प्रकारच्या औषधी आहेत की, त्यांचा योग्य उपयोग करून घेता आला तर प्राथमिक आरोग्यसेवेसाठी लोकांना महागड्या औषधांवर विसंबून रहावे लागणार नाही. वनौषधींची स्थानिक परंपरा व आयुर्वेदाची महत्परंपरा यांच्यात योग्य सांगड घातली गेली तर दोन्ही परंपरा अधिक समृद्ध होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दुपारच्या सत्रात श्री. पालेकर यांनी वनौषधी गोळा करण्यात येणाऱ्या काही अडचणी मांडल्या. त्यानंतर डॉ. पल्लिआ यांनी गोळा केलेल्या वनौषधींची नोंद ठेवण्याच्या शास्त्रीय पद्धतीचे विवेचन केले. वनौषधी जमा केल्यानंतर त्यांची नावे तज्ज्ञांच्या मदतीने लवकरात लवकर प्रसिद्ध करण्यात यावीत अशी सूचना त्यांनी केली.

१६ फेब्रुवारी रोजी सकाळी शिबिरार्थींनी गटागटाने फिरून वनौषधी गोळा केल्या. दुपारच्या सत्रात या वनौषधींची वनस्पतिशास्त्रातील नावे व त्यांचे उपयोग डॉ. कुंभोजकर यांनी सांगितले. पालेकर व आवारेगुरुजी यांनी त्यांची स्थानिक नावे सांगितली. डॉ विनय भावे यांनी या वनस्पतींचे आयुर्वेदिक उपयोग स्पष्ट केले.

यानंतर श्री. पालेकर यांनी स्थानिक वैदूंबरोबर संबंध प्रस्थापित करताना येणाऱ्या अडचणी व त्यांचे निराकरण कसे करावे यासंबंधी आपले अनुभव सांगितले. श्री. आवारे गुरुजी यांनीही आपले अनुभव सांगून काही उपयुक्त सूचना केल्या.

याप्रंतर वैद्य नानल यांनी आयुर्वेदशास्त्राचे सविस्तर विवेचन केले. आयुर्वेदामध्ये अद्ययावत संशोधनाची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. १आयुर्वेद उपचारपद्धतीमागील तत्त्वे २ विविध अन्नपदार्थांचे द्रव्यगुण यावर संशोधनास बराच वाव आहे. ॲकॅडमीमध्ये तयार करण्यात आलेल्या वनौषधींचे उपयोग त्यांनी स्पष्ट केले.

मूल्यमापनामध्ये पुढील महत्त्वाच्या सूचना केल्या गेल्या.

— वैद्य नानल यांनी आयुर्वेदातील वात, कफ, पित्त प्रकृतीच्या संकल्पना स्पष्ट करण्यासाठी २—३ दिवसांचे शिबिर घ्यावे.

— आयुर्वेद व हिंदू संस्कृती यामधील संबंधाचा ऐतिहासिक मागोवा घेऊ शकणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तीस बोलवावे.

— कार्यकर्त्यांना आपल्या शंकांचे निरसन करण्यास पुरेसा अवधी मिळावा. या दृष्टीने तज्ज्ञांनी कार्यकर्त्यांबरोबर २—३ दिवस रहावे.

वनौषधी व लोकविज्ञानक्षेत्रात ठिकठिकाणी चालू असलेल्या उपक्रमांची माहिती देणारी पुस्तिका दर ६ महिन्यांनी काढण्यात यावी.

यानंतर श्रीमती नॅन्सी गायकवाड यांनी आभारप्रदर्शन केल्यानंतर या कृतिसत्राचा समारोप झाला.

**—सुधीर जोग**

(कृतिसत्राच्या मूळ इंग्रजी अहवालाच्या आधारे)

# ‘ आदिवासी विकासाच्या विविध दिशा ’

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद व भारतीय सामाजिक शास्त्र अनुसंधान परिषद (पश्चिम विभागीय केंद्र) यांच्या संयुक्त विद्यमाने ‘Approaches to Tribal Development’—‘आदिवासी विकासाच्या विविध दिशा’—या विषयावरील दोन दिवसाचे चर्चासत्र २१ व २२ जानेवारी १९८३ रोजी मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात घेण्यात आले. आदिवासी संस्कृती व आदिवासी समस्या यांचे अभ्यासक, आदिवासी विकासाशी प्रत्यक्ष निगडित असलेल्या शासकीय खात्याचे अधिकारी व आदिवासी भागात प्रत्यक्ष राहून रचनात्मक कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते यांना या चर्चासत्रासाठी निमंत्रित करण्यात आले होते.

परिषदेचे सचिव प्रा. रा. के. मुटाटकर यांनी प्रास्ताविकात परिषदेची व चर्चासत्राची भूमिका स्पष्ट केली. आदिवासी भागामध्ये अनेक कार्यकर्ते गटागटाने गांधीवादी, मार्क्सवादी इत्यादी विविध तात्त्विक भूमिकांमधून रचनात्मक कार्य करीत आहेत. या कार्यकर्त्यांना आपापले क्षेत्रअनुभव व्यापक पातळीवर जोखून पाहण्याची तसेच काही समान प्रश्नांवर संघटित होण्याची निकड भासू लागली आहे. आदिवासी विकासाच्या विविध दिशांच्या संदर्भात कार्यकर्त्यांनी आपापल्या क्षेत्रअनुभवांची देवाणघेवाण करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. त्यानंतर गेली अनेक वर्षे आदिवासी भागामध्ये तळमळीने विकासकार्य करणारे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. दादासाहेब बीडकर यांनी चर्चासत्राचे औपचारिकरीत्या उद्‌घाटन केले. श्री. शरद कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते.

□

आदिवासींच्या शेतीविकासासाठी विविध प्रयोग व संशोधन करणाऱ्या कोसबाडच्या कृषिशिक्षणकेंद्राचे संचालक व ख्यातनाम कृषिशास्त्रज्ञ डॉ. जयंतराव पाटील यांचा निबंध त्यांच्या अनुपस्थितीत मुंबई विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक श्री. स. ह. देशपांडे यांनी वाचला. ‘आदिवासींमधील शेतीविकास’ (Agricultural Development Among Tribals) या विषयावरील डॉ. पाटील यांच्या निबंधामध्ये पुढील प्रमुख मुद्द्यांचा समावेश होता.

१. आदिवासींच्या दारिद्र्याचे ऐतिहासिक दृष्टिकोणातून विश्लेषण. जमीनदार, सावकार, जंगल-ठेकेदार व व्यापारी यांच्याकडून केल्या जाणाऱ्या शोषणामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ३५ वर्षांनंतरदेखील आदिवासी दारिद्र्यात खितपत पडलेला आहे.

२. भाज्या, फळे यांच्या रोपवाटिका, आंबा व बोर यास कलम करणे, गवतउत्पादन इत्यादि प्रयत्नांद्वारे आदिवासींच्या शेतीविषयक समस्यांतून मार्ग काढणे शक्य आहे.

यावरील चर्चेत प्रामुख्याने पुढील मुद्दे आले—

१. शेतीचे सुधारित तंत्रज्ञान आदिवासी अजूनही का स्वीकारीत नाहीत याची सामाजिक, सांस्कृतिक कारणे शोधण्याची आवश्यकता आहे.

२. शेतीविकासाचे आधुनिक तंत्रज्ञान आदिवासींपर्यंत पोहोचविण्यासाठी समाजशास्त्रज्ञांचे सहकार्य घेण्याच्या भारतीय कृषी संशोधन अनुसंधानाच्या निर्णयाचे स्वागत करण्यात आले. आदिवासींना परिचित असलेल्या कृषिउत्पादनांचे तंत्रज्ञान त्यांच्यावर लादण्याचे प्रयत्न होऊ नयेत. याउलट त्यांना पूर्णतः परिचित अशा स्थानिक कृषिउत्पादनाचे उत्पन्न वाढविण्यासाठी योग्य असे तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देण्यात यावा.

३. आदिवासींचा स्वतःच्या जीवनाकडे, आपल्या समाजाकडे व बाह्य समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोण काय हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

४. सध्याच्या समाजव्यवस्थेमध्ये ‘मार्केट इकॉनॉमी’ला पर्याय नसल्याने आदिवासींच्या अर्थकारणाचे टप्प्याटप्प्याने मार्केट इकॉनॉमीमध्ये रूपांतर करावे लागेल.

५. आजचा आदिवासी आपला आत्मविश्वास, अस्मिता गमावून बसलेला आहे. ही गमावलेली अस्मिता त्याच्यामध्ये पुन्हा जागृत करावयाची असेल तर केवळ तळमळ, प्रामाणिकपणा व सेवाभाव एवढेच

पुरेसे नसून आदिवासींमध्ये आपल्या हक्कांविषयी अनौपचारिक व प्रौढ शिक्षणाद्वारे जाणीव—जागृती करून प्रसंगी संघर्ष करून त्यांच्या विकासाचा मार्ग त्यांना खुला करून देता येईल.

शनिवार दि. २२ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात श्री. शरद कुलकर्णी यांनी आदिवासी आणि जंगले (Forest and the tribals) या विषयावरील आपले इंग्रजी टिपण मांडले. वनविधेयक संसदेत मांडले जाण्यापूर्वी त्याचा सर्वांगीण फेरविचार व्हावा यासाठी संबंधित अभ्यासक व स्वयंसेवी संघटनांनी चालविलेल्या यशस्वी मोहिमेची इत्थंभूत माहिती त्यांनी दिली. आदिवासी व जंगले यामधील अन्योन्य संबंधांचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून विश्लेषण करून त्यांनी ब्रिटिश काळापासून आजपर्यंतच्या सरकारच्या वनविषयक धोरणाचा आढावा घेतला व स्वातंत्र्योत्तर काळातही भारत सरकारने ब्रिटिशांच्या व्यापारी वननीतीचाच अवलंब केलेला असून जंगलवासी आदिवासींच्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष केलेले आहे हे प्रभावीपणे निदर्शनास आणून दिले.

घरबांधणीसाठी, तसेच सरपणासाठी लाकूड, गवत वाळलेली पाने, फळे, कंदमुळे व लघुउद्योगांसाठी बांबू इ. संबंधीच्या आदिवासींच्या जंगलविषयक परंपरागत हक्कांवर गदा आणण्याचे प्रयत्न पूर्वीचे जंगलविषयक कायदे तसेच संकल्पित वनविधेयक यामध्ये करण्यात आलेले आहेत. संकल्पित वनविधेयकातील तरतुदींना अभ्यासक व स्वयंसेवी संघटनांनी केलेल्या तीव्र विरोधामुळे त्याचा फेरविचार करण्याचे सरकारने ठरविले आहे. जंगलातील खेड्यांच्या, तसेच जंगलकामगारांच्या समस्या या टिपणात मांडण्यात आल्या आहेत. आदिवासींची जीवन—संस्कृती जंगलाशी पूर्णतः निगडित असल्याने वनसंवर्धन कार्यक्रमांमध्ये आदिवासींचा सहभाग मिळविणे आवश्यक आहे.

## आदिवासींचा सहभाग हवाच

गुजराथ विद्यापीठाच्या आदिवासी संशोधन केन्द्रातील डॉ. आर. बी. लाल यांनी आदिवासींच्या अर्थकारणाला गती देण्यासाठी वनविकास कार्यक्रमांची पुनर्रचना करण्याची आवश्यकता आपल्या निबंधात प्रतिपादन केली. वनविषयक गरजांबाबत स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने खेडे हा घटक मानण्यात यावा यावर त्यांनी भर दिला. गावातील बिगरशेतीची सर्व जमीन वनआवरणाखाली आणली गेली पाहिजे. त्यांच्या निबंधावरील चर्चेमध्ये परंपरेने आदिवासी अन्न उत्पादन करणारे नसून अन्न गोळा करणारे आहेत असे निदर्शनास आणले गेले. आदिवासी खरोखरच वृक्षप्रेमी आहेत का हे तपासून पाहिले पाहिजे असा मुद्दा उपस्थित केला गेला. यावर आदिवासींनी झाडे लावली नाहीत, याचा अर्थ तो वृक्षप्रेमी नाही असा होत नाही असे स्पष्टीकरण दिले गेले. आदिवासींचा सहभाग मिळाल्याशिवाय वनसंवर्धन अशक्य आहे हे सरकारी अधिकाऱ्यांनीच मान्य केले.

श्री. कुलकर्णी व श्री. लाल यांच्या निबंधांवरील चर्चेचा समारोप करताना श्री. कुलकर्णी म्हणाले—हजारो वर्षे आदिवासी जंगले व त्यांच्यातील सामंजस्यामुळे टिकून आहेत. जंगलांचे व्यापारी वृत्तीने शोषण करू इच्छिणारे काही महाभाग पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने जंगलांचे संरक्षण व आदिवासींचे हितसंबंध यामध्ये विरोधाभास आहे असे म्हणू लागले आहेत. हितसंबंधातील या तथाकथित संघर्षावर उत्तर शोधण्याचा मार्ग सरकारी धोरणे दर्शवितात त्याप्रमाणे आदिवासींना जंगलाबाहेर हुसकावून देऊन वनजमिनी व वनउत्पादने यावरील त्यांच्या परंपरागत हक्कांपासून त्यांना वंचित करणे हा नसून उलट आदिवासींना उपजीविका मिळवून देऊ शकेल, त्याचबरोबर राष्ट्राच्या जंगलसंपत्तीत भर पडेल अशा प्रकारे समाजाभिमुख वनव्यवस्थापनपद्धती उभारणे हा आहे.

## प्रौढ शिक्षणाचे महत्त्व

यानंतर धुळे जिल्ह्यातील आदिवासी भागात गेली अनेक वर्षे शिक्षणकार्य करीत असलेले ज्येष्ठ आदिवासी कार्यकर्ते श्री. जनार्दनमहाराज वळवी यांचे आदिवासींच्या शिक्षणासंबंधीचे टिपण त्यांच्या अनुपस्थितीत श्री. सुधीर जोग यांनी वाचले. महाराष्ट्र शासनाच्या सक्तीच्या शिक्षणपद्धतीमध्ये व्यावसायिक ज्ञानाचा समावेश नसल्याने नोकरीशिवाय पर्याय नाही अशा प्रकारची विद्यार्थ्यांची भावना होऊन बसली आहे. आदिवासींना तर या प्रकारचेही शिक्षण मिळत नाही. आदिवासी भागातील बऱ्याचशा शाळा अकार्यक्षम असल्याचा आपला अनुभव आहे असे त्यांनी या टिपणात नमूद केले आहे. त्यांच्या मते खर्चिक असली

तरीही आश्रमीय शिक्षणपद्धतीच आदिवासींच्या शिक्षणाची समस्या सोडवू शकेल. आदिवासींच्या शिक्षणासंबंधी स्वयंसेवी संस्थांचे कार्य प्रशंसनीय आहे. शासनाने सरकारी आश्रमशाळा व स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या आश्रमशाळा यामध्ये दुजाभाव करू नये. दोन्हीकडे चांगल्या–वाईट गोष्टी आहेत. आश्रमशाळांचे सरकारीकरण करून हा प्रश्न सुटणारा नाही, विद्यापीठे वा शिक्षणशास्त्रसंस्थांनी सरकारी वा स्वयंसेवी संस्थांच्या आश्रमशाळांच्या कार्याचे मूल्यमापन करून त्यात सुधारणा सुचवाव्यात. किती पैसा खर्च झाला किंवा किती विद्यार्थी उत्तीर्ण झाले यापेक्षाही किती विद्यार्थ्यांवर शिक्षणाने सुसंस्कार घडले, किती जण दारूच्या व्यसनातून मुक्त झाले या गोष्टींचा विचार मूल्यमापन करताना होणे आवश्यक आहे. आदिवासींची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी शिक्षणाला पर्याय नाही ही गोष्ट स्पष्ट आहे. याव्यतिरिक्त शिक्षणाचे माध्यम, शिक्षणाचा आशय, शिक्षकांची क्षमता शिक्षक व विद्यार्थी यातील दुरावा इ. प्रश्नांची चर्चा या टिपणात करण्यात आली आहे. यावरील चर्चेत आदिवासी भागामध्ये अनौपचारिक व प्रौढ शिक्षणाचे महत्त्व प्रतिपादन केले गेले.

श्रीमती नॅन्सी गायकवाड यांनी ‘ठाकूर जमातीतील स्त्रियांचा आदिवासी विकासकार्यातील सहभाग’ हे टिपण सादर केले.

यानंतर प्रा. रा. के. मुटाटकर यांनी सर्व सत्रातील चर्चेचे थोडक्यात समालोचन केले. कार्यकर्त्यांच्या क्षेत्रअनुभवांचा लाभ विविध प्रश्नांसंबंधीची धोरणे ठरविण्यासाठी, नियोजनासाठी तसेच संबंधित विषयाच्या ज्ञानात भर पडण्यासाठी व्हावा या दृष्टीने अशा प्रकारच्या अधिक चर्चासत्रांची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. विविध प्रश्नांची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजण्याच्या दृष्टीने हे चर्चासत्र उपयुक्त ठरले. आदिवासी भागातील आमदार व खासदार यांची बैठक आयोजित करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

यानंतर आयोजकांच्या वतीने डॉ. एस. डी. कर्णिक यांनी आभारप्रदर्शन केल्यानंतर या चर्चासत्राचा समारोप झाला.

**—संकलन : सुधीर जोग**

---

# माझा आदिवासी

सातपुड्याच्या सातही पुड्यांवर
आदिवासीचे घर, असून नाही.
अशाही त्या घर—बेघरात
सात सेकंदांचं सुख नाही.
सप्तरंगांपैकी त्या घराला
एकही रंग झळकत नाही.
भारतमातेच्या या बालकांना
धान्याचं कणीस गवसत नाही.
सप्तबाहुबल धारिणी सरस्वतीचे
एकाही हाताचा आशीर्वाद
माझ्या दीनबंधू आदिवासीला
अजून मिळत नाही.

**—लक्ष्मण कदम**
**(भारतीय कष्टकरी संघटना, शहादे)**

# अलिप्त बुद्धिवादी

## ऑटो रेने कॅस्टिलो*

एके दिवशी
माझ्या देशातील
अलिप्त बुद्धिवाद्यांना,
सामान्यातील सामान्य जन
प्रश्न करतील !
विचारतील,
ज्या वेळी एकलेपणाच्या मंद आगीत
त्यांचे राष्ट्र जळत होते
त्या वेळी ते काय करीत होते ?

कुणी विचारणार नाही
त्यांच्या वेषभूषेबद्दल,
ना दुपारच्या जेवणानंतरच्या
त्यांच्या प्रदीर्घ वामकुक्षीविषयी
ना त्यांच्या नेति नेतिच्या
कल्पनेसंबंधीच्या
विकल लढायांसंबंधी.

त्यांच्या आर्थिक व्यवहाराबद्दलच्या
अगाध ज्ञानाविषयी
कोणी फिकीर करणार नाही
प्राचीन ग्रीक वा आर्य
पुराणांविषयी
त्यांना कुणी विचारणार नाही,
त्यांच्यापैकीच कुणी तरी
भेकडपणाने मृत्यूला
कवटाळल्यावर
त्यांना स्वतःविषयीच
वाटणाऱ्या तिरस्काराबद्दल
कोणी विचारणार नाही.


संपूर्ण असत्याच्या छायेत
जन्मलेल्या त्यांच्या
व्यस्ततावादी समर्थनांना
कुणी भीक घालणार नाही.

त्या दिवशी,
ज्यांना अलिप्त बुद्धिवाद्यांच्या
कोणत्याही पुस्तकात वा
काव्यात स्थान नाही,
परंतु ज्यांनी दररोज
त्यांच्या घरी बिनतक्रार
दूध, अंडी, ब्रेड पुरवली,
त्यांचे कपडे रफू केले,
त्यांच्या गाड्यांची शोफरगिरी केली,
त्यांच्या कुत्र्यांची, बागांची
देखभाल केली,
ते लोक बुद्धिवाद्यांना विचारतील,
" गरीब लोक मूकपणे पिचत होते,
कणाकणाने जळत होते,
तेव्हा तुम्ही काय करीत होता ?
जवाब द्या ! "

**( अनुवाद : शरद कुलकर्णी )**

*मध्य अमेरिकेतील क्रांतिकारी कवी.

# ग्रामीण विकास व अनौपचारिक शिक्षणकार्य



(प्रशिक्षण शिबिर, ६–७ मार्च १९८३)

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी ग्रामीण विकासासाठी विविध स्वयंसेवी संघटना व कार्यकर्ते काम करीत आहेत. काही संघटना प्रौढ शिक्षण, साक्षरताप्रसार व जाणीव-जागृतीचे कार्य करतात, काही संघटना लोकांना रोजगारहमी कायदा, किमानवेतन कायदा इ. माहिती देतात, काही आरोग्यविषयक शिक्षण देतात, काही संघटना लोकांमध्ये विज्ञाननिष्ठा निर्माण करून अंध-श्रद्धेचा प्रभाव दूर करण्याचे प्रयत्न करीत आहेत.

या प्रकारच्या शैक्षणिक कार्यामध्ये गाणी, नकला, लोककला इ. सांस्कृतिक माध्यमांचाही उपयोग केला जातो. स्वयंसेवी संस्थांच्या विविध क्षेत्रांतील शैक्षणिक कार्याचा परस्परांना परिचय व्हावा व त्यातून त्यांचे कार्य प्रभावी होण्यास मदत व्हावी, त्याचबरोबर सामाजिक कार्यात रस असणाऱ्या विचारवंतांनाही अशा शैक्षणिक कार्याचा परिचय व्हावा या दृष्टीने पुणे विद्यापीठाच्या मानसशास्त्र व राज्यशास्त्र या विभागांतर्गत ग्रामीण विकास आंतरअभ्यासविषयक केंद्राच्या वतीने या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन ६ व ७ मार्च १९८३ रोजी शिवाजी सभागृहात करण्यात आले होते. या शिबिरामध्ये महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद व आदिवासी जाणीव जागृति केंद्र यांचा सक्रिय सहभाग होता. महाराष्ट्राच्या सर्व भागातील सुमारे ३५ सामाजिक कार्यकर्ते या शिबिरास उपस्थित होते.

६ मार्च १९८३ रोजी सकाळी १० वाजता उद्घाटन-समारंभ सुरू झाला. केंद्राचे निमंत्रक डॉ. ना. र. इनामदार यांनी आपल्या प्रास्ताविकात या शिबिराचे प्रयोजन स्पष्ट केले. त्यानंतर प्रख्यात साहित्यिक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री. शंकरराव खरात यांच्या हस्ते या प्रशिक्षणशिबिराचे उद्घाटन झाले. आपल्या उद्घाटनपर भाषणामध्ये श्री. खरात यांनी ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत पुढील तीन प्रकार दिसून येतात असे प्रतिपादन केले. जुना माणूस जुनं खेडं (७०%) जुना माणूस नवं खेडं (४५%), नवा माणूस नवं खेडं (५%) या तिन्ही प्रकारांचे उत्कृष्ट चित्रण त्यांनी केले. काही खेड्यांना नवं व्यक्तिमत्त्व प्राप्त झालं; परंतु माणसाच्या जाणिवा, संस्कार जुनेच राहिले. परिवर्तनसन्मुख होण्यास सुशिक्षित माणूससुद्धा अजून बिचकतो. रस्त्यावरील अंधार नाहीसा झाला असला तरी माणसाच्या मनातील अंधार अजून कायम आहे. केवळ आर्थिक विकास म्हणजे ग्रामविकास नव्हे. नवा माणूस निर्माण झाला तरच ग्रामीण विकास खऱ्या अर्थाने होईल असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले.

## ग्रामीण जनता वंचित

शिबिराच्या पहिल्या सत्राचा विषय 'आरोग्य-विषयक शैक्षणिक कार्य' असा होता. या सत्रामध्ये डॉ. अरविंद पटवर्धन व डॉ. अनंत फडके यांनी मार्गदर्शन केले. डॉ. वसंत पेठे अध्यक्षस्थानी होते. डॉ. पेठे यांनी इ. स. २००० पर्यंत बालमृत्यू, जन्म आणि मृत्यू या सर्वांचेच प्रमाण कमी करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. वैद्यकीय यंत्रणा शहरी भागात एकवटली आहे, ग्रामीण जनता या सोयींपासून वंचित राहिली आहे. (curative medicime) क्युरेटिव्ह मेडिसिन-मध्ये बरीच प्रगती झाली असली तरी प्रिव्हेंटिव्ह मेडिसिन (preventive medicine) मागेच राहिले आहे. Health for All by 2000 A. D. ही घोषणा

सार्थ करावयाची असेल तर प्रिव्हेंटिव्ह मेडिसिनमध्ये प्रगती होणे आवश्यक आहे. वैद्यकीय शास्त्रातील ॲलोपथी, आयुर्वेद, नॅचरोपथी यापैकी कोणतीही पॅथी कमी न लेखता सर्व शाखांचा साकल्याने विचार होणे आवश्यक आहे. स्वास्थ्याबद्दलच्या अंधश्रद्धा कशा दूर करता येतील, लोकांमध्ये शास्त्रीय दृष्टिकोण निर्माण करण्यात कोणत्या अडचणी येतात व त्यांचे निराकरण कसे करावे याचा विचार स्वयंसेवी संस्थानी व कार्यकर्त्यांनी केला पाहिजे.

कार्यकर्त्यांच्या चर्चेत प्रामुख्याने सगळ्यांचा सूर एकच होता की, डोंगराळ भागात सरकारी यंत्रणा पोहचू शकत नाही. कार्यकर्ते तेथे पोहोचले तरी त्यांच्याजवळ औषधे नसतात किंवा औषधांचे ज्ञान नसते. तज्ज्ञांनी कार्यकर्त्यांना किंवा भगत, वैदू यांना वनौषधींच्या वापराचे शास्त्रशुद्ध शिक्षण दिले तर लोकांना वेळेवर आणि स्वस्तात औषधोपचार उपलब्ध होतील.

डॉ. अनंत फडके यांच्या मते राहण्यासाठी अपुरी जागा, अस्वच्छ पाणी यामुळे आरोग्य बिघडते. यामुळे डॉक्टर किंवा औषधे यापेक्षाही आरोग्यशिक्षण अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे डोंगराळ भागात, खेड्यात डॉक्टर पोहचत नाही याचा बाऊ करण्याचे कारण नाही. त्यांच्यामध्ये जुलाबासारख्या आजारावरही अत्यंत सुलभ असे गूळ, मीठ, पाणी यांचे मिश्रण द्यावे. कारण या तिन्ही जिनसा लोकांना सहजगत्या मिळण्यासारख्या असतात.

## छोट्या पत्रकांची गरज

डॉ. अरविंद पटवर्धन म्हणाले–वैद्यकशास्त्र हे अनुभवावरून प्रगत झालेलं आहे. मूलतः ॲलोपॅथी व वनौषधी एकच आहेत. कोणतेही औषध रोग बरे करणारे नसते तर रोग फक्त दबवणारे किंवा तात्कालिक आराम देणारे असते. साधारणतः कोणत्याही रोगाची कालमर्यादा ठरलेली असते. त्यामुळे ठराविक मुदतीनंतर आपोआप बरे वाटते. शालेय शिक्षणात आरोग्यशिक्षणाचा अंतर्भाव व्हायला हवा. साध्या–साध्या आजारावरील पुस्तके उपलब्ध व्हावीत. सिल्व्हरओकसारखी छोटी पत्रके जरी तयार करण्यात आली तरीही आरोग्यशिक्षणाचे कार्य होऊ शकेल.

दुसऱ्या सत्राचा विषय–वैज्ञानिक व सांस्कृतिक शिक्षणकार्य असा होता. या सत्रात डॉ. किशोर चौकर व डॉ. एम. आर. भिडे यांची व्याख्याने होऊन त्यावर चर्चा झाली. अध्यक्षस्थानी डॉ. इनामदार होते.

डॉ किशोर चौकर म्हणाले–ग्रामीण विकासासाठी वैज्ञानिक शिक्षण द्यावयाचे म्हटले म्हणजे काही प्रश्न उपस्थित होतात.

१. शिक्षणाची पद्धती, शिक्षण देणारे व घेणारे यांच्यातील तफावत.

२. शिक्षण कुणाला द्यावयाचे ? स्त्रिया, पुरुष, मुले ?

३. कोणते शिक्षण द्यावयाचे ? आणि ते कोणी ठरवायचे ?

शरीररचना–आरोग्यशास्त्र यांचं शिक्षण द्यायचं की, ज्यामुळं आर्थिक प्रगती होईल असं विज्ञानशिक्षण द्यायचं ? कोणतं शिक्षण द्यायचं याविषयीच्या अग्रक्रमाबद्दल शिक्षण देणाऱ्यांना स्पष्ट कल्पना हवी.

सांस्कृतिकदृष्ट्या काही विज्ञान अमान्य होतं. उदा. भाकड गायींची हत्या केली तर डेअरीचा धंदा किफायतशीर होईल; परंतु गोहत्या आपल्या संस्कृतीत निषिद्ध मानलेली असल्यानं लोकांना मान्य होत नाही. वस्तुस्थितीला धरून असलेलं आणि बदलत्या संदर्भाबरोबर बदलू शकेल असंच ज्ञान लोक स्वीकारतात. लोकांच्या जीवनसंस्कृतीशी सुसंगत असंच शिक्षण लोक स्वीकारतात.

४. लोकांचं उत्पन्न वाढू शकेल असं शास्त्रीय ज्ञान देण्यात यावं.

५. लोकांना न पेलणारं तंत्रज्ञान दिलं गेलं तर ग्रामीण माणूस जागा सोडून दुसरीकडे जाईल.

६. शिक्षक कोणते घ्यावयाचे ? त्याच गावातले की दुसरीकडचे ?

७. गावातल्या लोकांच्या सोयीच्या वेळेप्रमाणे शिक्षण द्यावं.

डॉ. भिडे यांनी पुढील प्रमुख मुद्दे मांडले–

१. विज्ञान व तंत्रज्ञान यात फरक आहे.

२. विज्ञान ही एक संस्कृती आहे, तिचा प्रसार शिक्षणाद्वारेच करता येईल.

३. विज्ञान व तंत्रज्ञान यात योग्य सांगड घातली गेली पाहिजे.

४. शिक्षण केवळ पोटासाठीच द्यावयाचं का ? वैज्ञानिक मूल्यांचा प्रसार केवळ पोटासाठी स्पर्धा

म्हणून नाही तर ज्ञानासाठी व्हावा.

५. ज्ञानाच्या नव्या माध्यमांचा संबंध ग्रामीण भागाशी जोडला तर खेड्यांकडून शहराकडे वाहणारा लोंढा थोपविता येईल.

यावरील चर्चेत प्रामुख्याने पुढील मुद्दे आले– विज्ञान व तंत्रज्ञान हे काही गटांच्या लोकांच्या हातात केंद्रित झालेले असल्याने त्याचे विकेन्द्रीकरण होऊन ते ग्रामीण भागापर्यंत पोहचणे फार अवघड आहे. लोकांमध्ये विज्ञाननिष्ठा निर्माण होऊन अंधश्रद्धा, बुवाबाजी इ. ला आळा बसावा या दृष्टीने पुणे येथील लोकविज्ञान संघटना प्रयत्न करीत आहे. बुवाबाजीच्या विरोधात बुवाबाजी ही दैवी शक्ती नाही असा प्रचार त्यांचे कार्यकर्ते करीत आहेत. याबाबत प्रदर्शने, शिबिरे घेतली जातात. लोकांमध्ये परीक्षावृत्ती आहे; परंतु ते आध्यात्मिक वातावरणाला बळी जातात. आध्यात्मिक वातावरण निर्माण करून लोकांच्या नैसर्गिक बुद्धीवर झापड आणण्याचे प्रयत्न जाणूनबुजून केले जातात. लोकांच्या दैनंदिन व्यवहारात विज्ञानाला स्थान मिळावे यासाठी लोकविज्ञान संघटनेने विज्ञान–दिनदर्शिका तयार केली आहे. खेड्यापाड्यांतील जनतेने विज्ञानाचा प्रसार व्हावा यासाठी संघटनेने नुकतीच विज्ञान-दिंडी आयोजित केली होती. ग्रामीण जनतेचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद या दिंडीस मिळाला. विज्ञानप्रसाराचे कार्य अनेक स्वयंसेवी संस्थांनी हाती घेण्याची आवश्यकता आहे.

## खेड्यात संशोधन व्हावे

चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी भागात काम करणारे संघर्षवाहिनीचे कार्यकर्ते डॉ. सतीश कुसुमवसंत यांनी ग्रामीण भागातील लोकांकडे वैज्ञानिक दृष्टी जरूर आहे असे ठामपणे सांगितले. ज्याला संशोधन करावयाचे असेल त्याने ग्रामीण भागात राहिले पाहिजे म्हणजे कोणत्या प्रकारचे तंत्रज्ञान लोकांपर्यंत पोहचविता येईल याची उत्तरं मिळतील. संशोधनाची केन्द्रं खेड्यांत झाली तर व्यवहारातील अडचणी सोडविणे शक्य होईल.

तिसऱ्या सत्राचा विषय- साक्षरता व सामान्यज्ञान-प्रसारासाठी केले जाणारे शैक्षणिक कार्य असा होता. या सत्रात प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ डॉ. चित्रा नाईक व पुणे विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण केन्द्राचे मानद संचालक डॉ. भालचंद्र फडके यांची व्याख्यानं होऊन त्यावर कार्यकर्त्यांनी चर्चा केली व साक्षरता व समाज-ज्ञान-प्रसार-कार्यातले आपले अनुभव सांगितले. अध्यक्ष-स्थानी डॉ. इनामदार होते.

## साक्षरतेनेच विकास

डॉ. चित्रा नाईक यांनी प्रौढ साक्षरता कार्यक्रमांचा ऐतिहासिक दृष्टिकोणातून आढावा घेऊन साक्षरता हे जाणीवजागृतीचे व पर्यायाने विकासाचे एक साधन आहे असे प्रतिपादन केले. प्रौढ शिक्षणकार्यक्रमासाठी १५–३५ हा वयोगट निश्चित करण्यात आला आहे. स्वातंत्र्यानंतर सक्तीचे शिक्षण न दिल्याने हा गट निरक्षर राहिला. देशातील १० कोटी निरक्षरांपैकी सुमारे ४ कोटी पुरुष व ६ कोटी स्त्रिया आहेत. आपली पुरुषप्रधान संस्कृती, निरर्थक बडबडीत स्त्रिया घालवीत असलेला वेळ व स्त्रियांचा एकत्र न येण्याचा दोष ही स्त्रिया निरक्षर राहण्याची कारणे आहेत. प्रौढ साक्षरतेच्या प्रश्नावर सखोल संशोधन, विचार व प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. लोकांमध्ये जाऊन हे केलं पाहिजे, जे दिसेल ते समजाऊन घेतलं पाहिजे, प्रौढांसाठी काही विशिष्ट शिक्षणपद्धती बसविल्या पाहिजेत. या शिक्षणातून जो संदेश द्यावयाचा तो लोकांना पचेल, रुचेल असा असायला हवा. प्रौढ शिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी कार्यक्षम माणसं मिळवणं व त्यांचं प्रशिक्षण करणं हा एक फार मोठा प्रश्न आहे.

त्यानंतर कार्यकर्त्यांनी आपले अनुभव, अडचणी व विचार मांडले.

संघटकांच्या नेमणुकीबाबतच्या अटी अधिक शिथिल करण्यात याव्यात. वयाची अट अयोग्य आहे. लिहिता-वाचता येणाऱ्या व कार्यक्रमाच्या मौलिकतेची जाणीव असलेल्या कमी वयाच्या कार्यकर्त्यांनाही संधी देण्यात यावी. शिक्षणाची साधने अपुरी आहेत, पगार कमी आहेत. संघटकांकडून सरकारच्या अपेक्षा मात्र खूप आहेत. पैसे वेळेवर मिळत नाहीत. वारंवार अहवाल पाठवावे लागल्याने निष्कारण वेळ जातो व वस्तुनिष्ठ अहवाल पाठविणारेच उलट अडचणीत येतात.

## स्वयंसेवी संस्थांना उत्तेजन

डॉ. चित्रा नाईक यांनी हा कार्यक्रम राबविण्या-

साठी जबाबदार स्वयंसेवी संस्थांना उत्तेजन देण्यात यावे असे प्रतिपादन करून संघटकांच्या प्रशिक्षणासाठी काही पुस्तिका तयार करण्याचे प्रयत्न इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन करीत असल्याची माहिती दिली.

डॉ. भालचंद्र फडके यांनी काही विचार मांडले— या कार्यक्रमाविषयी शासन उदासीन आहे. कारण लोक जागृत व्हावेत असं सत्ताधाऱ्यांना मनातून वाटत नाही. कार्यक्रमाला ते उघड विरोध करीत नसले तरी तो पूर्णपणे यशस्वीही होऊ देत नाहीत. या कार्यक्रमाची सरकारकडून होणारी पाहणी अत्यंत तांत्रिक स्वरूपाची असते. शासन प्रस्थापितांचे असल्याने परिवर्तनाभिमुख नसणे स्वाभाविक आहे. स्वयंसेवी संस्थांना हे कार्य स्वतंत्रपणे करता येणं हेही अवघड आहे. कारण प्रस्थापितांशी झगडण्यात बराच वेळ जातो. एकूण वस्तुस्थिती समजून घेऊन हे कार्य पुढे नेले पाहिजे. नवसाक्षर वाचकवर्गाचे भान लेखकांना असायला हवे; परंतु लेखक दुर्दैवाने या नव्या वाचकवर्गापासून दूर आहेत अशीही तक्रार त्यांनी केली.

चर्चेत कार्यकर्त्यांनी पुढील सूचना केल्या—

१५–३५ या वयोगटाऐवजी १०–२० व २१–३५ असे दोन गट पाडावेत म्हणजे १० ते १५ ही ५ वर्षे फुकट जाणार नाहीत. या कार्यक्रमात देण्यात येणारं शिक्षण लोकाभिमुख व वैविध्यपूर्ण असावं. अनेक गट एकत्र काम करतात. त्यांनी बहुविध स्वरूपाचं कार्य करावं. संघटकाने लोकांची सर्व कामे करीत बसण्यापेक्षा मार्गदर्शन करावं. लोकांना त्यांच्या गरजा व प्रश्न काय आहेत याची जाणीव करून देऊन ते सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यास लावले पाहिजे. संघटकाने लोकशिक्षणासाठी स्लाइडशो, प्रदर्शने इत्यादी आधुनिक प्रचारमाध्यमांबरोबरच स्वस्त, उपयुक्त व प्रभावी अशा भजन, कीर्तन यांसारख्या पारंपारिक प्रचारमाध्यमांचाही उपयोग करावा.

चौथ्या सत्राचा विषय— 'आर्थिक व राजकीय हक्कविषयक शैक्षणिक कार्य' असा होता. या सत्रात श्री. शरद कुलकर्णी व वसंत देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी डॉ. गो. स. कामत होते.

## लोकशिक्षणानेच समाजपरिवर्तन

श्री. शरद कुलकर्णी यांच्या भाषणात प्रामुख्याने पुढील मुद्दे आले—

लोकशिक्षणकार्याचे स्वरूप राजकीय पक्ष व औपचारिक शिक्षणापेक्षा वेगळे आहे. लोकशिक्षणाचे काम करणारे सुमारे ३०० गट देशात आहेत, महाराष्ट्रात ७०–७५ गट आहेत. विविध गटांच्या समाजपरिवर्तनाच्या संकल्पना वेगळ्या असल्या तरीही सर्वच गट लोकशिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे असे मानतात. लोकांची सत्ता प्रस्थापित व्हावी हे अंतिम उद्दिष्टच आहे. हे गट विविध क्षेत्रात लोकशिक्षणाचे काम करीत असतात. केवळ एका विशिष्ट क्षेत्रातच काम न करता विविध क्षेत्रांत करावे लागते. अन्यथा कार्य एकांगी होण्याचा धोका असतो. इथल्या सामाजिक कृतीची जाण समाजशास्त्रज्ञांना अद्याप आलेली नाही. समाजशास्त्रज्ञांनी अधिक निष्ठेने सामाजिक कृतिकार्यास सहकार्य करणे आवश्यक आहे. त्यामुळे सामाजिक कृती अधिक आशयपूर्ण होऊन त्याची व्याप्ती व खोली वाढू शकेल. सामाजिक कृतीचा रेटा लावला तर तातडीने कामे होतात, पुढच्या कार्यास गती येते, अधिक सामर्थ्य प्राप्त होते. सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या कामात अधिकाधिक लोकांचे सहकार्य मिळविले पाहिजे. सामाजिक कृती करणाऱ्यांना शेवटी स्वतःच्या पायांवर उभे रहावे लागते.

## संघर्ष ही जीवनपद्धती नको

डॉ. गो. स. कामत यांचे प्रतिपादन पुढीलप्रमाणे—

संघर्ष हा विकासाचा एक मार्ग जरूर असू शकतो; परंतु विकासाच्या अंतिम उद्दिष्टांच्या पूर्तीच्या दृष्टीने दर्जाच्या दृष्टीने हा मार्ग फारसा योग्य नाही. संघर्ष ही जीवनपद्धती होता कामा नये. सरकारपासून फटकून राहून खऱ्या अर्थाने विकास साधणार नाही. सरकारी कर्मचाऱ्यांना कामाचं श्रेय मिळत नसल्याने तसेच दबावामुळे ते विकासकार्यात रस घेत नाहीत. स्वयंसेवी संस्थांनी आपल्या कार्याने सरकारला विकासकार्यास प्रवृत्त केलं पाहिजे. स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये आपल्या पायावर उभं रहाण्याचं सामर्थ्य आल्यानंतर गटानं तेथून अंग काढून घेऊन दुसऱ्या क्षेत्रात काम उभं करून द्यावं. स्थानिक पातळीवर संस्थात्मक संरचना उभी करणं निकडीचं आहे.

डॉ. वसंत देशपांडे यांनी काही विचार मांडले— समाजपरिवर्तनाशी बांधिलकी मानणाऱ्या स्वयंसेवी

संस्था अनेक आहेत. सत्ताधाऱ्यांवर व राजकीय पक्षावर अंकुश ठेवण्याचे काम अखेर स्वयंसेवी संस्था व कार्यकर्तेच करू शकतील. सामाजिक व आर्थिक विकास हे शेवटी एक राजकीय कार्यच आहे. आर्थिक विकास ही शेवटी एक राजकीय प्रक्रियाच आहे. आर्थिक कार्यक्रमांना रचनात्मक व विधायक कार्याची जोड देणं आवश्यक आहे. कार्यकर्त्यांना जाणकारांची व तज्ज्ञ विचारवंतांची जोड व सहकार्य मिळालं तरच सामाजिक व आर्थिक विकास अर्थपूर्ण व आशयपूर्ण होईल.

डॉ. इनामदार यांनी एकूण चर्चेचे समालोचन करून काही विचार मांडले. स्वयंसेवी संस्था व विद्यापीठ यांच्यामध्ये सुसंवाद नाही तो साधला जाणे आवश्यक आहे. लोकशाही समाजरचनेमध्ये स्वयंसेवी संस्थांचे स्थान अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. स्वयंसेवी संस्थांच्या कार्याचे सुसूत्रीकरण करण्याचे प्रयत्न लोकनायक जयप्रकाशजींनी सुरू केले होते. त्यांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

यानंतर प्रा. म. बा. मांडके यांच्या आभाप्रदर्शनाने या शिबिराचा समारोप झाला.

प्रा. म. बा. मांडके सुधीर जोग

## संस्थापरिचय

# अॅकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स

'अॅकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स' जून १९७९ पासून कशेळे (ता. कर्जत जि. रायगड) येथे काम करीत आहे. या संस्थेच्या स्थापनेमागे पुढील प्रमुख उद्दिष्टे होती.

० विकासविज्ञान ही ज्ञानशाखा विकसित करणे.

० नोकरी वा व्यवसायाच्या प्रचलित चाकोरीबाहेर जाऊन ग्रामीण व आदिवासी भागात रचनात्मक कार्य करू इच्छिणाऱ्या व करीत असलेल्या सामाजिक कार्यकर्त्यांना, तसेच पदवीधर युवकांना प्रत्यक्ष कृतीवर आधारित अशा अनौपचारिक उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.

० पारंपरिक वैद्यक, पर्यावरण, स्थानिक पातळीवरील राजकीय अर्थकारण, अनौपचारिक शिक्षण, तंत्रज्ञान, लोककला व अन्य जनसंपर्कमाध्यमे या क्षेत्रांतील प्रत्यक्ष कृतीवर आधारित अध्ययनास प्रोत्साहन देणे. या क्षेत्रांत तालुकापातळीवर अव्यवहार्य व खर्चिक अशा अधिकृत सरकारी विकासयोजनांना अल्पखर्चीं व व अर्थपूर्ण अशा पर्यायी विकासयोजना तयार करणे.

० लोकांचा अधिकाधिक सहभाग वाढवून तालुकापातळीवर राजकीय शिक्षणाची व्याप्ती वाढवणे.

० देशभरातील स्वयंसेवी संस्थांशी सतत संपर्कात राहून त्यांच्या कार्यात सहकार्य करणे.

या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी सामाजिक कार्यकर्ते व पदवीधर युवक यांना शिष्यवृत्त्या देऊन वरील क्षेत्रात संशोधन, अध्ययन करण्यास उत्तेजन दिले जाते. तसेच विविध विषयांवरील सामाजिक कार्यकर्त्यांच्या अभ्यास व कृतीशिबिरांसाठी संस्थेच्या परिसरात आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

संस्थेमध्ये प्रत्यक्ष कृतीवर आधारित असे पुढील अध्ययन, संशोधनप्रकल्प सुरू आहेत.

१. कर्जत आदिवासी भागासाठी समुचित तंत्रज्ञानयोजना.

२. कर्जत आदिवासी भागात पारंपरिक वैद्यक व वनौषधींच्या वापरास उत्तेजन देणारी योजना.

३. कर्जत आदिवासी भागासाठी वनसंवर्धन व वनविकास योजना.

४. कर्जत आदिवासी गटातील मालाची देवाण–घेवाणपद्धती व स्थानिक अर्थकारण यावरील अध्ययनप्रकल्प.

५. गौण वनोत्पादनप्रक्रियाकेंद्र.

संस्थेने देशभरातील स्वयंसेवी संस्थांची माहिती देणारी सूची व 'स्वयंसेवी संस्था व तंत्रज्ञान', 'स्थानिक पातळीवरील नियोजन व विकेंद्रीकरण', 'वर्तमानयुगातील शैक्षणिक आव्हाने' हे तीन प्रबंध तसेच 'जनजागरण गटांसाठी जनसंपर्क माध्यम, कळसूत्री बाहुल्या' यावरील इंग्रजी पुस्तिका असे विविध साहित्य तयार केले आहे.

संस्थेमध्ये वननीती, वनौषधी व लोकविज्ञान यावरील अभ्यास व कृतीशिबिरे घेण्यात आली.

**संपर्कासाठी पत्ता :**

**अॅकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स.**
**मु. पो. कशेळे**
**ता. कर्जत जि. रायगड, ४१० २०१.**




# ‘आर्थिक धोरणाशी वननीतीची सांगड हवी’

आदिवासींच्या समस्यांच्या संदर्भात वननीतीबाबत बरीच चर्चा अलीकडे व्हावयास लागली आहे. पर्यावरणाचे प्रश्नही बिकट होत चालल्याने वननीती-बाबत साकल्याने विचार चर्चिले जातात. दिल्ली येथील इंडियन सोशल इन्स्टिटयूट येथे एप्रिल १९८२ मध्ये आयोजित केलेल्या शिबिराचा वृत्तांत ‘टूवर्डस् ए न्यू फॉरेस्ट पॉलिसी’ या पुस्तकात समर्थपणे मांडण्यात आला आहे. या पुस्तकाचे तीन मुख्य भाग आहेत— (१) प्रचलित वननीती (२) वनविधेयक व (३) नवीन वनधोरण. दहा अधिकारी व्यक्तींचे लेख या पुस्तकात दिले आहेत.

१९८० च्या नियोजित भारतीय वनविधेयकाच्या संदर्भात शिबिर भरविण्यात आले होते. विधेयकाच्या भाषेवरून व कलमांवरून वनांचे आदिवासी व इतर वन–निवासींपासून कसे रक्षण करावे यावर भर देण्यात आला असे दिसते. व्यापारी–औद्योगिक हितसंबंधांमुळे वनांचे नुकसान होते, या तथ्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. त्यामुळे आदिवासी-क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी या विधेयकास कडाडून विरोध केला.

शिबिराचा सूर स्थानिक लोकांच्या सांस्कृतिक व आर्थिक गरजांची पूर्तता व वनधोरणात लोकांचा सहभाग असा आहे. आदिवासींना जंगलांतून अन्न, चारा, निवारा व औषधे प्राप्त होतात हे नाकारता येत नाही. याउलट उद्योगपतींना जंगल कच्च्या मालाची साधनसामुग्री पुरविते. ब्रिटिशांनी स्वतःच्या देशातील, अमेरिकेतील व आफ्रिकेतील दक्षिण भागातील जंगलांचा नाश केल्यावर भारतातील जंगलांकडे नजर वळविली. युरोपीय लोकांच्या गरजा व वन–व्यवस्थापन हे भारतात गैरलागू आहे हे ब्रिटिशांना कळणे अशक्यच होते. तरीही व्यापारी हितसंबंधांमुळे बुरुडांसारख्या परंपरागत वनावर अवलंबून राहणाऱ्या लोकांचे अतोनात हाल झाले व होत आहेत. या संबंधात कडक विधेयक करून लोकांना विश्वासात न घेता प्रश्न सुटणे अशक्यच आहे.

सामाजिक वनीकरण हा जंगले वाढविण्याच्या कार्यात क्रांतिकारक तोडगा समजला जातो. सामाजिक वनीकरणाद्वारा ग्रामीण लोकांच्या गरजा भागविणे, त्यांना काम मिळवून देणे, पडीक जमिनीचा उपयोग व त्याची पोत वाढविणे असे उद्देश मांडण्यात आले; परंतु या पुस्तकात जे अनुभव नमूद करण्यात आले आहेत त्यावरून कार्यक्रम राबविताना ते सफल होत नाहीत असे दिसते. गुजरातेत मात्र इतर राज्यांच्या मानाने यशाचे प्रमाण अधिक दिसते. झपाट्याने वाढणाऱ्या झाडांमुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडते असा एक विचार मांडण्यात आला आहे.

पुस्तकात आरक्षित वनांचा साकल्याने विचार मांडण्यात आला आहे. वन्य प्राण्यांसाठी ठेवण्यात आलेली आरक्षित वने, परंपरेने आरक्षित राहिलेल्या देवराया, तसेच स्थानिक चालीरीतींमुळेही वनांचे भाग आरक्षित राहतात. आरक्षित वनांचा विचार केवळ वाघ व इतर हिंस्र पशूंच्या संदर्भात न होता एकंदर प्राणिजगत व त्याचा पर्यावरणाशी संबंध या व्यापक भूमिकेतून व्हावयास हवा.

आर्थिक धोरणाच्या संदर्भात वननीतीचा विचार करणे आवश्यक आहे. वननीतीमुळे गरीब व श्रीमंत यांमधील दरी वाढणार आहे काय? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. लोकांना कोणत्या परिस्थितीत जंगल वाढविण्यास आवडेल, याचा शोध घेऊन नवीन

वननीती आखावयास हवी. या कल्पनेतून पुस्तकात चर्चा केली आहे. वननीतीविषयी शास्त्रीय दृष्टिकोण पुस्तकात मांडले आहेत. प्रत्येक वन–अभ्यासकास हे पुस्तक फार उपयुक्त ठरेल. ◻

'टूवर्डस् ए न्यू फॉरेस्ट पॉलिसी'
जल-अधिकार व पर्यावरणाच्या गरजा
संपादन : वॉल्टर फर्नांडिस व शरद कुलकर्णी
इंडियन सोशल इन्स्टिटयूट,
लोदी रोड, नवी दिल्ली–११०००३, १९८३

# भामरागडचे माडिया

श. गो. देवगावकरांनी 'भामरागडचे माडिया' हे पुस्तक लिहून आदिवासींविषयक साहित्यात मोलाची भर घातली आहे. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे मानवशास्त्रज्ञ फ्युरर हॅमॅनडॉर्फ यांनी या पुस्तकास पुरस्कार लिहिला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सनदी अधिकाऱ्यांनी व वेरियर एल्विन आणि हॅमॅन डॉर्फसारख्या मानवशास्त्रज्ञांनी भारतातील आदिवासी संस्कृतीवर विपुल लेखन केले; परंतु भारतीय शास्त्रज्ञांनी त्यात मोलाची भर टाकलेली नाही. या पुस्तकात महाराष्ट्रातील एका आदिवासी जमातीच्या संस्कृतीवर शास्त्रीय संशोधन करून प्रकाश टाकला आहे.

इतर ठिकाणच्या गोंडांपेक्षा भामरागडचे माडिया कसे भिन्न आहेत, त्यांच्यात साम्य काय आहे हे या पुस्तकामुळे उमजते. पुस्तकात माडियांच्या सामाजिक व आर्थिक संस्थांव्यतिरिक्त विकासप्रयत्नांचा त्यांच्या जीवनावर होणाऱ्या परिणामांचेही यथार्थ वर्णन आहे. शासकीय धोरणे व प्रत्यक्षात ती अंमलात येताना त्याचे होणारे विपर्यस्त परिणाम हे उदाहरणे देऊन लेखकाने मांडले आहेत. लेखक, संशोधक व समाजकार्यकर्ते अशा दुहेरी भूमिकेत वावरत असल्याने आदिवासींच्या समस्यांची त्यांना चांगली जाण आहे.

आदिवासींमध्ये रस असलेल्या प्रत्येकाने वाचावे असे हे पुस्तक आहे. ◻

'द माडिया ऑफ भामरागड'
लेखक : श. गो. देवगावकर
इंटर–इंडिया प्रकाशन,
दिल्ली। १९८२



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे कार्यक्रम

१. १९७६ मध्ये ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी भागात घेण्यात आलेल्या आदिवासी शिक्षणावरील कृतीसत्रास आदिवासी भागातील ४० महाविद्यालयीन शिक्षक उपस्थित होते. कृतीसत्रानंतर जव्हार येथे चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

२. १९७८ मध्ये पुणे विद्यापीठाच्या मानवशास्त्र विभागाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या वैद्यकीय मानव शास्त्रावरील आंतरराष्ट्रीय परिसंवादास १०० भारतीय व ५० परदेशी अभ्यासक उपस्थित होते. आरोग्य, संस्कृती व समाज यांच्यातील परस्पर संबंधावर या परिसंवादात सखोल अध्ययन व चर्चा झाली.

३. १९७९, १९८० व १९८३ मध्ये आयोजित केलेल्या आदिवासी समस्यांवरील चर्चासत्रास समाजकार्यकर्ते, अभ्यासक व शासकीय अधिकारी उपस्थित होते.

४. १९७९ मध्ये धुळे जिल्ह्यातील धडगाव येथे आदिवासी कार्यकर्त्यांसाठी विकासविषयक समस्यांवर चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

५. नोकरीविषयक माहिती पुरविण्याच्या योजनेचा फायदा आजवर सुमारे २००० आदिवासी युवकांना मिळाला.

६. आदिवासी भागात अधिकाधिक विकास प्रकल्प कार्यान्वित व्हावेत या दृष्टीने परिषद प्रयत्नशील आहे. धुळे जिल्ह्यातील सहकारी दुग्धप्रकल्पासाठी बीजभांडवल उपलब्ध करून देण्यात आले.

७. १९८१ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वनविकास महामंडळाच्या सहकार्याने नाशिक वनविभागाचा अभ्यासदौरा अयोजित करण्यात आला. या अभ्यासदौऱ्यात आदिवासी व जंगलविषयक प्रश्नांवर शासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

८. १९८१ उत्तराखंड अभ्यास मोहीम : उत्तराखंड भागातील बेसुमार जंगलतोडीमुळे निर्माण झालेल्या पर्यावरणविषयक समस्या व त्यातून उभे राहिलेले चिपको आंदोलन यांचा अभ्यास व पाहणी करण्यासाठी आयोजित केलेल्या अभ्यासदौऱ्यात महाराष्ट्रातील सुमारे ५० आदिवासी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ' हाकारा ' पहिला, जानेवारी-मार्च | १९८० | : | जबरन जोत जंगल जमीन खास अंक |
| ' हाकारा ' दुसरा, एप्रिल-जून | १९८० | : | आदिवासी व शिक्षण खास अंक |
| ' हाकारा ' तिसरा, जुलै- सप्टेंबर | १९८० | : | आदिवासी व वनसंवर्धन खास अंक |
| ' हाकारा ' चौथा, ऑक्टोबर-डिसेंबर | १९८० | : | आदिवासी साहित्य व कला खास अंक |
| ' हाकारा ' पाचवा, जानेवारी-मार्च | १९८१ | : | दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| ' हाकारा ' सहावा, एप्रिल-जून | १९८१ | : | आदिवासी व आरोग्य खास अंक |
| ' हाकारा ' सातवा, जुलै-सप्टेंबर | १९८१ | : | वनशेती व वनसंवर्धन खास अंक |
| ' हाकारा ' आठवा, ऑक्टोबर-डिसेंबर | १९८१ | : | रोजगार हमी योजना विशेषांक |
| ' हाकारा ' नववा, जानेवारी-मार्च | १९८२ | : | ' उत्तरा खंड अभ्यास मोहीम ' विशेष अंक |
| ' हाकारा ' दहावा, एप्रिल-जून | १९८२ | : | ' धरणे व विकास ' खास अंक |
| ' हाकारा ' अकरा-बारा, जुलै-डिसेंबर | १९८२ | : | ' जंगल व्यवस्थापन ' खास अंक |
| ' हाकारा ' तेरावा, जानेवारी-मार्च | १९८३ | : | ' आदिवासी व दारू ' खास अंक |


## यांच्या सहकार्याबद्दल परिषद आभारी आहे

१. शिक्षण व युवक कल्याण मंत्रालय, भारत सरकार.

२. भारतीय सामाजिक शास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केन्द्र.

३. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ.

४. आदिवासी कल्याण संचलनालय, महाराष्ट्र शासन.

५. वनविकास महामंडळ, महाराष्ट्र.

६. कम्युनिटी एड अब्रॉड, ऑस्ट्रेलिया.


* * *

**, हाकारा ' आगामी अंक :** १. मानवशास्त्र व आदिवासी समाजकार्य

२. आदिवासी स्त्री

३. आदिवासी साहित्य व कला

आगामी अंकासाठी लेखक व कार्यकर्त्यांनी आपले लिखाण वा अनुभव परिषदेच्या पत्त्यावर सत्वर पाठवावे.

Registered with the Registrar of Newspapers for India Under No. 35835/80

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

(१) आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन

(२) कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण

(३) शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे

(४) मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे

(५) मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या सर्व उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशांचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व–

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २०० रुपये |
| परिषद वार्षिक सभासद | २० रुपये |
| विद्यार्थी ,, ,, | १५ रुपये |

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामुल्य पाठविला जातो.

आपली सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषद' (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अँथ्रापॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे पाठवावी. चेक पाठविल्यास अधिक दोन रुपयांची वटणावळ पाठवावी.

## पत्रव्यवहाराचा पत्ता :

**रा. के. मुटाटकर**
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
ई / ५, प्राध्यापक निवास,
पुणे विद्यापीठ, पुणे – ४११००७

* आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे ! *